अस्सल सोलापुरी


# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | सोमवार, दि. १२ जून २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : २५३ वा किंमत : ५ रुपये | पाने ८



राज्याचे
माजी उपमुख्यमंत्री
मा.श्री. विजयसिंह शंकरराव मोहिते-पाटील

आपणांस वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा !

। शुभेच्छुक ।

शिवरत्न शिक्षण संस्था, अकलूज
ता.माळशिरस जि.सोलापूर

श्री शिवपार्वती सार्वजनिक विकास ट्रस्ट, शंकरनगर-अकलूज
ता.माळशिरस जि.सोलापूर

शिवामृत दूध उत्पादक सहकारी संघ मर्या, विजयनगर-अकलूज
ता.माळशिरस जि.सोलापूर

# पुनश्च हरिओम...

एखादी चांगली गोष्ट पुन्हा एकदा करायची म्हटली तर त्याला अध्यात्म क्षेत्रात पुनश्च हरिओम असे म्हटले जाते. आज भारतीय राजकारणात कोण कुणाचा मित्र होईल वा शत्रू होईल याचा नेम नाही.जे कुणी पुन्हा मैत्री करू पहात आहेत. त्यांच्या मैत्रीचा पुनश्च हरिओम होतोय, असेच म्हणावे लागेल. राजकारणात एका मैत्रीचा प्रसंग समोर आल्यामुळे आम्ही हे एक सुभाषित आपल्याला सांगितले. दक्षिण भारतात जम बसवण्यासाठी भारतीय जनता पार्टीकडून जोरदार हालचाली सुरू झाल्या आहेत. कर्नाटकातील दारूण पराभवानंतर दिल्लीतील भाजपा नेत्यांचे डोळे घडल्याचे या प्रसंगावरून म्हणता येईल. आंध्रप्रदेशात भाजपाने आपला नवा नाही पण जुनाच एक मित्रपक्ष जवळ करण्याचा घाट घातला आहे. हा पक्ष म्हणजे तेलुगू देशम. माजी मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांच्याशी युती करण्याच्या हालचाली सुरू आहेत. चंद्राबाबू यांनाही त्यांच्या राज्यात राजकीयदृष्ट्या स्थिर व्हायचे आहे. त्यामुळे त्यांनाही राष्ट्रीय पक्षाची गरज भासू लागली आहे. एकंदरीत विश्लेषण करायचे झाल्यास चंद्राबाबूंनाही उपरती झाली आहे. नायडू यांनी दोनच दिवसांपूर्वी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतल्याने ते पुन्हा भाजपबरोबर जाणार का, अशी चर्चा होणे स्वाभाविकच आहे. कर्नाटकातील पराभवामुळे भाजपाला दक्षिण भारतातील मोठे राज्य गमवावे लागले. दक्षिण भारत पादाक्रांत करण्याच्या भाजपाच्या योजनेला यामुळे लगाम लागला. लोकसभेच्या १३० जागा असलेल्या दक्षिणेत भाजपापुढे मोठे आव्हान आहे. यामुळेच भाजपाला आता नवीन मित्र शोधावाच लागणार आहे. आपसूकच नायडूंनी शहांची भेट घेतल्याचा प्रसंग भाजपाच्या पथ्यावर पडला. आंध्रात परिवर्तनाचे वारे वाहात आहेत.विद्यमान मुख्यमंत्री जगनमोहन रेड्डी यांच्या विरोधात वातावरण असल्याचे सांगितले जाते. त्याचा फायदा नायडू हे उचलू पहात आहेत पण त्या फायद्यासाठी थोडी राजकीय ताकत त्यांना हवी आहे. म्हणूनच त्यांनी भाजपाची वाट धरलेली असावी. भाजपाला



दक्षिणेत आतापर्यंत कर्नाटकची सत्ता मिळाली. पुद्दुचेरीमध्ये पक्ष सत्तेत असला तरी ते छोटे राज्य आहे. केरळात पक्षाला विधानसभा निवडणुकीत भोपळाही फोडता आलेला नाही. आंध्र प्रदेशात पक्षाची ताकद मर्यादित आहे. तमिळनाडूत अण्णा द्रमुकबरोबरील युतीत चार आमदार निवडून आले. तेलंगणात भाजपाने जोर लावला आहे. कर्नाटकात यशाची अपेक्षा होती पण तेथे पराभव झाला. दक्षिणेकडील राज्यांमध्ये स्वबळावर पक्षाला यश मिळणे कठीण दिसते. आंध्रप्रदेशात भाजपाने जनसेना पक्षाचे नेते सुपरस्टार पवन कल्याण यांच्या पक्षाबरोबर युती केली आहे. पण पवन कल्याण यांच्या भूमिकेबद्दल भाजपाला शंका वाटते. आंध्रप्रदेशात पुन्हा स्वबळावर सत्तेत येण्याबाबत नायडू यांनाही पूर्ण खात्री नसावी. यामुळेच पुन्हा एकदा भाजपाशी युती करण्याची चंद्राबाबूंची तयारी असावी. अटलबिहारी वाजपेयी सरकारच्या काळात चंद्राबाबू हे राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे समन्वयक होते. पुढे त्यांचे भाजपाशी बिनसले.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना ओव्हरटेक करण्याचा प्रयत्न नायडू यांनी केला. वास्तविक पाहाता मोदींनी नायडूंशी जुळवून घेतले होते. राष्ट्रीय लोकशाही आघाडीत नायडूंचे वर्चस्व होते परंतु मोदींशी त्यांनी निष्कारण पंगा घेतला. त्यातूनच नायडूंना आघाडीतून बाहेर पडावे लागले. नायडूंनी भाजपाची साथ सोडली नसती तर आंध्रात वेगळे चित्र दिसू शकले असते. आता भाजपाशी युती करून सत्तेत परतण्याचा चंद्राबाबूंचा प्रयत्न असेल. नायडूंची हीच उपरती. गेल्या विधानसभा निवडणुकीत जगनमोहन रेड्डी यांच्या वायएसआर काँग्रेसच्या झंझावातापुढे चंद्राबाबूंचा पार धुव्वा उडाला होता. नायडू हे शहा यांना भेटल्यानंतर लगेचच पोलावरम सिंचन प्रकल्पाकरिता केंद्राने सुमारे १३ हजार कोटी मंजूर केले. तत्पूर्वी, आंध्रच्या विभाजनानंतर देय असलेली १० हजार कोटींपेक्षा अधिक निधी हस्तांतरित केला. यावरून गेल्या महिनाभरात आंध्रला केंद्राने सुमारे २३ हजार कोटी रुपये मंजूर केले आहेत. आंध्रप्रदेशात एका पक्षाला पूर्णपणे कौल मिळतो, असा अनुभव आहे. २०१४ मध्ये चंद्राबाबू नायडू तर २०१९ मध्ये जगनमोहन यांना एकहाती सत्ता मिळाली होती. जगनमोहन यांच्या सरकारबद्दल नाराजी असल्यास भाजपकडून अन्य पर्यायांचा विचार केला जाऊ शकतो.

## सामाजिक

# ओझ्याखाली चिरडलेले बालपण...

'बालमजुरी' हा कायदेशीर गुन्हा असून एक सामाजिक शाप आहे, जो मुलांना शाळेत जाण्याचा हक्क हिरावून घेतो आणि गरिबी वाढण्यास हातभार लावतो. अनेक बालकामगार प्रतिबंधक कायदे आणि जनजागृती करूनही बालमजुरी संपत नाही. युनायटेड नेशन्सची उपकंपनी म्हणून काम करणारी आंतरराष्ट्रीय कामगार संघटना, बालमजुरीची व्याख्या अशी करते, बालमजुरी हे असे काम आहे जे मुलांचे बालपण, त्यांची क्षमता आणि त्यांचा सन्मान हिरावून घेते आणि ज्यामुळे शारीरिक आणि मानसिक विकासास हानी पोहोचते. ही समस्या पुढे अनेक गंभीर सामाजिक समस्यांना प्रोत्साहन देते. बालमजुरीतून सुटका होऊन बालकांना त्यांचे हक्क मिळावेत यासाठी दरवर्षी १२ जून रोजी जगभरात बालमजुरीविरुद्ध जनजागृतीसाठी आंतरराष्ट्रीय बालमजुरीविरुद्ध दिवस साजरा केला जातो. यावर्षी यूएनद्वारे २०२३ ची थीम सर्वांसाठी सामाजिक न्याय आणि बाल कामगार समाप्ती अशी आहे. बालमजुरीविरुद्ध आपण सर्वांनी एकत्र येऊन लढा दिला पाहिजे तरच या समस्येतून सुटका होईल.

युनिसेफ इंडिया आणि इंटरनॅशनल लेबर ऑर्गनायझेशनच्या मते, २०११ च्या जनगणनेच्या आकडेवारीनुसार भारतात बालकामगारांची संख्या १.०१ कोटी आहे, त्यापैकी ५.६ दशलक्ष मुले आणि ४.५ दशलक्ष मुली आहेत. भारतात ४.२७ कोटींहून अधिक मुले शाळाबाह्य आहेत. भारतातील एकूण काम करणाऱ्या मुलांपैकी उत्तर प्रदेश, बिहार, राजस्थान, महाराष्ट्र आणि मध्यप्रदेश हे पाच राज्ये मिळून सुमारे ५५% मुले आहेत. सेव्ह द चिल्ड्रेन, २०१६ नुसार, उत्तर प्रदेशात बालकामगारांची सर्वाधिक संख्या आहे.

भारतातील २०% पेक्षा जास्त बालमजूर एकट्या या राज्यातील आहेत. कैलाश सत्यार्थी फाउंडेशनच्या अहवालानुसार आणि २०११ च्या जनगणनेच्या अंदाजानुसार चालू वर्ष २०२३ मध्ये भारतात ७८ लाख बालकामगार असतील. ज्यामध्ये मुले आणि मुलींचा वाटा अनुक्रमे ५७% आणि ४३% असेल. बालमजुरी वाढवण्यात कोरोना कालावधीने विशेष योगदान दिले आहे.

जागतिक स्तरावर एकूण १५२ दशलक्ष मुले (८८ दशलक्ष मुले आणि ६४ दशलक्ष मुली) बालमजुरीत असल्याचा अंदाज आहे, जे जगभरातील सर्व दहा मुलांपैकी एक आहे. युनिसेफने म्हटले आहे की, 'जगातील सर्वात गरीब, कमी विकसित देशांमध्ये, ५ पैकी १ पेक्षा जास्त मुले बालमजुरीमध्ये गुंतलेली आहेत.'

२०१२ मध्ये जागतिक स्तरावर बालकामगारांची संख्या १६८ दशलक्ष आहे. आशिया आणि पॅसिफिक प्रदेशात अजूनही बालमजुरांची सर्वाधिक संख्या सुमारे ७८ दशलक्ष किंवा ९.३% आहे. उप-सहारा आफ्रिका हा प्रदेश असा राहिला आहे, ज्यामध्ये ५९ दशलक्ष बालमजूर आहेत, अर्थात २१% पेक्षा जास्त. जागतिक स्तरावर सर्वात जास्त बालमजूर कृषी क्षेत्रात आढळू शकतात म्हणजे ९.८ कोटी आणि सेवा क्षेत्रात ५.४ कोटी, उद्योग क्षेत्रात १.२ कोटी बालमजूर आहेत. युनायटेड नेशन्स चिल्ड्रेन्स फंड युनिसेफच्या मते, ३००,००० हून अधिक बाल सैनिकांना सशस्त्र संघर्षात भाग पाडले गेले आहे.

बालमजुरी बंद करण्याच्या लढ्यात सरकारला मदत करण्याकरिता युनिसेफ, केअर इंडिया, कैलाश सत्यार्थी चिल्ड्रन फाउंडेशन, ग्लोबल मार्च अगेन्स्ट चाइल्ड लेबर, स्माईल फाउंडेशन, डॉन बॉस्को बालप्रफुल्लता, सेव्ह द चिल्ड्रन, चाइल्ड राइट अँड यू, हँड इन हँड इंडिया, बचपन बचाओ आंदोलन, तलाश असोसिएशन, इत्यादी एनजीओ काम करत आहे. हँड इन हँड इंडिया एनजीओ, ज्याने ३ लाखाहून अधिक मुलांना (माजी बालकामगार) पुन्हा शाळेत पाठवले. बालमजुरी करण्याची कोणतीही कारणे असो, पण बालमजुरी हे चुकीचे आहे, तो गुन्हा आहे. बालमजुरी निर्मूलनासाठी शासनाने विविध कायदे, धोरणे व कार्यक्रम सुरू केले आहेत, शासकीय नियमांचे काटेकोरपणे पालन करणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. बालमजुरी रोखण्यासाठी सरकारच्या श्रम आणि रोजगार मंत्रालयाने पेन्सिल पोर्टल तयार केले आहे. बालकामगार कुठेही दिसल्यास, पेन्सिल पोर्टलवर त्वरित लॉग इन करा आणि बालकामगार संबंधित तक्रारींसाठी ऑनलाइन तक्रार नोंदवा किंवा १०९८ हेल्पलाइन नंबरवर कॉल करा, अन्यथा आपण जवळच्या पोलीस स्टेशनशी देखील संपर्क साधू शकता. 'बचपन बचाओ आंदोलन' या स्वयंसेवी संस्थेचे हेल्पलाइन क्रमांक १८००-१०२-७२२२ वर देखील कॉल करू शकता. आपली जाणीव एखाद्या निष्पापाचे भविष्य उज्ज्वल करू शकते.

**- डॉ. प्रितम गेडाम, नागपूर.**



## जन्मदिन विशेष

# कर्तृत्वाचा महामेरू

पराकोटीचा संयम, चेहऱ्यावर कर्तृत्वाचे तेज, सतत समाजकार्याचा ध्यास, नवयुग निर्मितीची दृष्टी आणि आधुनिक दूरदृष्टीचा किमयागार म्हणून माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांचे जीवन नेहमीच प्रेरणादायी ठरलेले आहे. लोकसेवेची पन्नास वर्षे आजही दीपस्तंभाप्रमाणे या 'नवयुगा'ला खुणावत आहेत. जीवन कसे जगावे, याचे उत्तर इथेच आहे. कधीही कुणावर उपहास न करता अजातशत्रू व्यक्तिमत्त्व म्हणून आपली ओळख निर्माण करणे, ही साधी सोपी गोष्ट नाही. मिळालेल्या प्रत्येक पदाला त्यांनी कधीच अहंकाराचा वारा लागू दिला नाही. प्रत्येक पद लोकाभिमुख करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. माणुसकीला कधीही बाजूला पडू दिले नाही. प्रत्येक क्षण माणसात राहून शाश्वत माणुसकी धर्माची जपणूक केली. वाईट विचाराला मनात कधीच थारा दिला नाही. नेहमी चांगले विचार समाजाला देऊन वैचारिक सुदृढता निर्माण केली. आपुलकीच्या भावनेने सर्वांना आपलेसे केले, त्यामुळे एकदा संपर्कात आलेला माणूस त्यांच्यापासून कधीच दुरावला नाही. माणूसपण जपले. चौफेर विकासाच्या दृष्टिकोनातून भौगोलिक कायापालट केला, सत्ता असो वा नसो, आपल्या प्रभावशाली नेतृत्वाच्या माध्यमातून विकासाच्या वारूला त्यांनी उधळवले. हरितक्रांती करण्यास ते यशस्वी ठरले. त्यांची आजपर्यंतची ही लोकसेवा अद्यापही चालूच असून, अविरतपणा टिकवून ठेवला आहे. सामाजिक बांधीलकीच्या जाणिवेचा त्यांनी कधीच विसर पडू दिला नाही. सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील यांच्या विकासरथाला अधिक गतिमान वेगवान केले. समाजाला भाकरी इतकीच विचारांची गरज आहे. म्हणून महामानवांच्या विचारांना शिल्पसृष्टीच्या माध्यमातून जिवंत करण्याचा प्रयत्न केला. या सर्व शिल्पसृष्टीकडे महाराष्ट्र नव्हे तर संपूर्ण देश प्रेरणास्रोत म्हणून पाहत आहे. विकासासाठी दळणवळण सुविधा महत्त्वाची असते. म्हणून आठ राष्ट्रीय महामार्गाचे जाळे त्यांनी विणले. विकासाच्या वाटा त्यांनी मोकळ्या केल्या. हायमास्ट दिव्याच्या माध्यमातून अनेक गावांना त्यांनी प्रकाशमय केले. पिकअप शेड प्रकल्पातून प्रवाशांची सेवा केली. गरज पडेल तिथे आपले नेतृत्व खर्ची करणारे ते महाराष्ट्रातील अद्वितीय नेतृत्व ठरले. आजपर्यंतच्या जनसेवेला अखंडपणाची जोड दिली. बेघरांना घरकुले दिली. अल्पभूधारकांना जमिनीचे वाटप केले, सार्वजनिक विहिरी, बांधबंदिस्तीची कामे, कालव्याच्या वितरिका आणि त्यावरील नवीन फाटे यांच्या निर्मितीतून हजारो हेक्टर जिरायत क्षेत्रास सिंचनाचा लाभ




मिळवून दिला.

१९७२ च्या भीषण दुष्काळात सोलापूर जिल्ह्यातील अकरा तालुके आणि पुणे जिल्ह्यातील इंदापूर तालुका अशा बारा तालुक्यातील जनतेला मोफत पाणीपुरवठा करत लोकांची तहान भागविली. गुरांसाठी चारा छावण्यांची निर्मिती करून मोफत चाऱ्यांचे वाटप केले. मलबार हिल, मुंबई येथे नवीन सह्याद्री अतिथी गृहाची उभारणी, नागपूर येथे नवीन विस्तारित विधानभवनाची उभारणी , राज्यातील चार पालखी मार्गाचे रुंदीकरण करण्यात त्यांचे कार्य महत्त्वाचे ठरले. प्रतिथयश कलाकारांना शासन स्तरावर सन्मानित करण्यासाठी लता मंगेशकर पारितोषिक योजना १९९२ मध्ये सुरू केली. अकलूजसारख्या ग्रामीण भागात प्रथमच राज्यस्तरीय मराठी चित्रपट महोत्सव भरविला. सोलापूर जिल्ह्यातील तेरा तीर्थक्षेत्रांचा विकास केला. रोजगार हमी योजनेअंतर्गत अनेक कामे त्यांनी कार्यान्वित केली. शेतकरी शेतमजुरांना पूरक दुग्धव्यवसायास उपयुक्त ठरलेल्या कृत्रिम रेतन पैदास केंद्राची स्थापना केली. वृक्षारोपणाचे अनेक कार्यक्रम राबविले. रक्तदान चळवळीला बळकटी प्राप्त करून दिली. मुंबईतील घारापुरी (एलिफंटा केव्हज) येथे समुद्रातील धक्का दुरुस्तीसाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा केला. नोंदणीकृत युवक मंडळांना शासकीय अनुदान देण्याच्या पद्धतीत सुसूत्रता आणली. सर्व क्षेत्रात त्यांनी विकासाची किमया साधली आहे. आजही विकासाच्या झऱ्याला. त्यांनी थांबू दिले नाही. उजाडलेल्या नवीन दिवसाकडे नवीन काहीतरी करण्यासाठी त्यांची नजर शोधत असते. म्हणून जीवन कसे जगावे याचे उत्तर इथेच आहे. जीवनाचा खरा अर्थ त्यांच्या कर्तृत्वशील जीवनाकडे पाहिल्यावर कळून येतो. म्हणून या जगण्यावर शतदा प्रेम करावे असेच मनोमन वाटते. त्यांना वाढदिवसाच्या लाख लाख शुभेच्छा.

## जन्म हा अखेरचा

# प्राणानुग्रहस्थल - १



**प्राणो यस्य लयं याति शिवे परमकारणे ।**
**कुतस्तस्येंद्रियस्फूर्तिः कुतः संसारदर्शनम्**
**।। १७.२५।।**

आपल्याला नेहमी प्रपंचाचे दर्शन होत असते आणि आपले मन अधिकाधिक चचंल होत असते. याचे कारण प्राणावर आपले नियंत्रण नसते हे आहे. त्यामुळे आपली प्रवृत्ती बहिर्मुख होऊन प्रपंच पाहत असते. प्राणायामात श्वास घेऊन त्याचा हृदयात कुंभक करायचा असतो. कुंभक म्हणजे हृदयात प्राणवायू रोधून धरणे. रोधणे याचा अर्थ एके ठिकाणी स्थिर करणे. प्राणाचा कुंभक साधला की मन प्राणासोबत तेथेच थांबते आणि मनसोबत इंद्रियेदेखील तेथेच राहतात. प्राण स्थिर झाला की मन स्थिर होते आणि मनासोबत इंद्रिये स्थिर होणार. एकावर दुसरे अवलंबून असल्यामुळे प्राणानुग्रहस्थलात प्राण स्थिर करण्यावर भर दिला आहे. इंद्रियांसह मन आणि मनासह प्राण जेव्हा परशिवात विलीन होतो तेव्हा शिवयोग्याला बाह्य प्रपंचाचे दर्शन होत नाही. त्याला सर्वत्र भगवत्तत्त्वाचाच साक्षात्कार होत असतो.

**करणेषु निवृत्तेषु स्वार्थसंगात् प्रयत्नतः ।**
**ते समं प्राणमारोप्य स्वान्ते शान्तमतिः**
**स्वयंम् ।।१७.२६।।**

सर्व इंद्रिये आपापल्या विषयांपासून परावृत्त होऊन अंतर्मुख होतात. आपल्या मनाची अवस्था लहान मुलासारखी असते. ते खेळता खेळता माती खाते. माती खाण्याचे दुष्परिणाम त्याला माहित नसतात. केवळ मुलेच नव्हे तर मोठी माणसेही कधी कधी माती खातात. ती एक सवय असते. मातीत त्याला काय गोडी मिळते कुणास ठाऊक? काही मुलांना अंगठा चाखण्याची सवय असते. अंगठ्यातून काय दूध येते? पण ती सवय नडलेली असते. लाभ काहीच नसतो. तरी सवय सवयच असते. लहानपणी ठीक आहे, पण मोठेपणी ही सवय राहिली तर हसे होते. बिचाऱ्या मायबापांना चिंता वाटते की, कुणी वधुपिता आपल्या मुलाला पहायला आला अन् त्याने सवयीनुसार तेथे अंगठा चोखायला सुरुवात केली तर? मोठा झाला तरी सवय जात नसते. मुले सर्वांसमोर अंगठा चोखतात तर मोठा माणूस कोणी पाहत नसेल तेव्हा अंगठा चोखतो. आदतसे मजबूर, दुसरे काय? सवय लहानपणीच घालवता येते. माती खाणाऱ्या मुलाच्या हातून माती काढून त्याच्या हाती खडीसाखरेचा खडा ठेवला तर मूल खडीसाखरेची गोडी जाणते आणि माती खाणे सोडून देते. आपल्या मनाची अवस्था अशीच असते. त्याला विषयांत फार गोडी वाटते. ती त्याची सवयच बनून जाते. परंतु जर त्याला थोड्या प्रयासाने परमात्म्याकडे वळविले, **(क्रमशः) - काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

## जनमानस

# महापालखी मार्गासाठी मोलाचे योगदान

राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांचे संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माउली व तुकाराम महाराज पालखी मार्गासाठी मोलाचे योगदान राहिले आहे.

दळणवळण सुविधेवर राज्याची अर्थात देशाची प्रगती अवलंबून असते. यासाठी नेतृत्व करत असताना विजयसिंह मोहिते-पाटील यांनी दळणवळण सुविधेला आपल्या कारकिर्दीमध्ये अनन्यसाधारण महत्त्व दिलेले दिसते. बांधकाम खात्याचे मंत्री म्हणून काम करत असताना अनेक ऐतिहासिक रस्त्यांची मुहूर्तमेढ त्यांनी रोवली. त्यामुळे राज्याच्या प्रगतीला वाव मिळाला. लाखो वैष्णव आळंदी ते पंढरपूर व देहू ते पंढरपूर चालत असा प्रवास पायी चालत करीत पंढरपूरच्या विठुरायाच्या दर्शनाला जात असतात.

संतश्रेष्ठ माऊलीच्या व तुकाराम महाराजांच्या पालखीबरोबर पायी चालत जाण्याची ही परंपरा फार जुनी आहे. ऊन,



वारा पावसाची तमा न बाळगता लाखो वैष्णव पंढरीच्या पांडुरंगाला जातात. हा पायी प्रवास करत असताना ओबडधोबड रस्ते असल्याने वारकऱ्यांना नाहक त्रास सहन करावा लागत होता. अनेक अडचणींना सामोरे जावे लागत होते. दिवसेंदिवस पालखीसोबत जाणाऱ्या वारकरी बांधवांची संख्या वाढत असताना रस्त्यांचे नूतनीकरण करणे, रुंदी वाढविणे गरजेचे बनले होते. अनेक वेळा या रस्त्याने जाताना येताना विजयदादांच्या मनात हे रस्ते भव्य दिव्य करण्याचे दृढ विचार मनात यायचे. म्हणून त्यांनी प्राधान्याने बांधकाममंत्री असताना या पालखी मार्गांना न्याय देण्याचा प्रयत्न केला. हे पालखी मार्ग तीन पदरी निर्माण केली. त्यामुळे वारकरी बांधवांचा मार्ग सुकर होत गेला.

आज या मार्गाचे राष्ट्रीय महामार्ग निर्माण झाले आहेत. यामुळे दळणवळण सुविधेला तर गती मिळणारच आहे पण महाराष्ट्राचे वैभव असणाऱ्या पालखी सोहळ्यातील लाखो वैष्णवांना सोईस्कररित्या आपल्या पांडुरंगाच्या दर्शनाला जाता येणार आहे. म्हणूनच व्यापक आणि भव्य दिव्य पालखी मार्ग असावेत, या संकल्पनेला सुदृढ बनविणारे राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांचे योगदान मोलाचे आणि अनन्यसाधारण आहे. बांधकाममंत्री पदानंतर सुद्धा त्यांनी वेळोवेळी रस्त्यांचा पाठपुरावा केला. त्यामुळे त्यांच्या योगदानाची चर्चा आजही होताना दिसते.

**- डी. एस. गायकवाड, अकलूज.**

# कर्तृत्ववान नेतृत्व

**सहकाराच्या माध्यमातून क्रांती करणारे कै शंकरराव मोहिते-पाटील हे सहकार महर्षी ठरले. त्यांच्या पश्चात चौफेर विकासाची किमया साधत विजयसिंह मोहिते-पाटील हे विकासरत्न ठरले.**

विजयसिंह मोहिते-पाटील यांचा जन्म १२ जून १९४४ रोजी अकलूज येथे झाला. १९६२ पासून काँग्रेस पक्षाचे ते क्रियाशील सभासद बनले. अकलूजच्या सरपंचपदापासून त्यांनी आपल्या राजकीय जीवनाला प्रारंभ केला. सरपंच असताना त्यांनी त्या काळात युवकांचे संघटन बांधले. ग्रामपंचायतीच्या माध्यमातून मिळालेल्या निधीचा त्यांनी पुरेपूर वापर करीत अकलूजचा चेहरामोहरा बदलून टाकला. सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील यांनी जे विकासाचे स्वप्न पाहिले होते ते खऱ्या अर्थाने भविष्यात विजयसिंह यांनी पूर्ण केले. सहकार महर्षी यांच्या पश्चात विकास करताना त्यांनी कधीही विकास रथाला थांबू दिले नाही. १९७१ ते १९७९ च्या काळात सोलापूर जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद त्यांनी भूषवले. १९७२ च्या भीषण दुष्काळात सोलापूर जिल्ह्यातील अकरा तालुके व पुणे जिल्ह्यातील इंदापूर तालुका अशा बारा तालुक्यातील जनतेला टँकरद्वारा पिण्याच्या पाण्याचा विनामूल्य पुरवठा केला, गुरांसाठी छावण्या काढल्या, मोफत चाऱ्याचे वाटप केली यासह जिल्हा परिषदेच्या माध्यमातून अनेक योजना त्यांनी राबवल्या. १९८० साली झालेल्या माळशिरस विधानसभा निवडणुकीत प्रचंड मताधिक्क्याने निवडून येत विधानसभेत त्यांनी प्रवेश केला. १९८२ साली मुख्यमंत्री बाबासाहेब भोसले यांच्या विस्तारित मंत्रिमंडळात त्यांना कृषी पर्यटन व युवक कार्य विभागाचे उपमंत्री म्हणून संधी मिळाली. पुढे १९८३ साली वसंतदादा पाटील यांच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळात पाटबंधारे व लाभक्षेत्र विकास विभागाचे राज्यमंत्री म्हणून त्यांचा समावेश झाला. राज्यमंत्री या नात्याने त्यांनी या काळात वीस कलमी कार्यक्रमानुसार पाटबंधारे विभागासाठी निर्धारित केलेले प्रतिवर्षी १२५ लक्ष हेक्टरपेक्षा अधिक क्षेत्र सिंचनाखाली आणण्याचे उद्दिष्ट साध्य केले. नीरा देवधर प्रकल्पाच्या पूर्ततेसाठी



पाठपुरावा केल्यामुळे भोर (पुणे), खंडाळा व फलटण (सातारा), माळशिरस (सोलापूर) या तालुक्यांना लाभ मिळवून दिला. १९८५ साली झालेल्या माळशिरस विधानसभा मतदारसंघातून ते पुन्हा विक्रमी मताधिक्क्याने निवडून आले. जुलै १९८५ ते मार्च १९८६ या काळात शिवाजीराव पाटील-निलंगेकर यांच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळात कृषी पुनर्वसन आणि क्रिडा युवक कल्याण खात्याचे कॅबिनेट मंत्री म्हणून त्यांचा समावेश झाला. मंत्रिमंडळात काम करत असताना त्यांनी विकासाचा डोंगर उभा केला. मिळालेल्या प्रत्येक खात्याला त्यांनी लोकाभिमुख करण्याचा प्रयत्न केला. माळशिरस विधानसभा मतदारसंघातून तिसऱ्यांदा विक्रमी मताधिक्क्याने निवडून येण्याची किमया साधली.

राज्य मंत्रिमंडळात त्यांनी त्या काळात कॅबिनेट मंत्री म्हणून काम पाहिले. १९९५मध्ये चौथ्यांदा विक्रमी मताधिक्क्याने माळशिरस विधानसभा मतदारसंघातून निवडून आले. या काळात त्यांनी विरोधी पक्ष उपनेते म्हणून काम पाहिले. १० जून १९९९ रोजी त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. १९९९ ऑगस्टमध्ये ते माळशिरस विधानसभा निवडणुकीत पाचव्यांदा निवडून आले. १९९९ पासून सार्वजनिक बांधकाम खात्याचे कॅबिनेट मंत्री ते झाले. २७ डिसेंबर २००३ रोजी ते महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री झाले. जुलै २००४ पासून फलोद्यान विभागाचे कॅबिनेट मंत्री म्हणून त्यांनी कार्यभार स्वीकारला. २००४ साली झालेल्या निवडणुकीतही ते विक्रमी मताधिक्क्याने निवडून आले. या काळात त्यांनी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. राज्याच्या पर्यटन आणि ग्रामविकास मंत्री पदाचा कारभार त्यांनी याच काळात पाहिला. २०१२ मध्ये त्यांची राज्यपाल नियुक्त विधानपरिषद सदस्यपदी नियुक्ती झाली. त्यानंतरच्या काळात देशात मोदी लाट असतानाही ते २०१४ साली झालेल्या लोकसभा निवडणुकीत खासदारही झाले. आपल्याला मिळालेल्या पदाचा त्यांनी समाज विकासासाठी पुरेपूर उपयोग केला. त्यामुळे विकासाची किमया चौफेर साधली. नेहमी हसतमुख राहून जनमानसाच्या स्वप्नांना गवसणी घालणारा हा नेता आहे. ते अनेकांच्या प्रेरणास्थानी असून त्यांना उदंड आयुष्य लाभो याच वाढदिवसानिमित्त शुभेच्छा...

**विजयदादांविषयीचे लेख डी. एस. गायकवाड, अकलूज यांनी लिहिलेले आहेत.**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

अस्सल सोलापुरी

# सुराज्य सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

## चिमणी पाडकामाची मुदत संपली; आता महापालिकेच्या भूमिकेकडे लक्ष

सोलापूर : महापालिका प्रशासनाने कुमठे येथील श्री सिध्देश्वर साखर कारखान्याच्या चिमणी पाडकामाला दिलेली मुदत रविवारी संपली असून सोमवारी महापालिका कारवाई करणार का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. मात्र अद्याप रविवारी रात्री उशिरापर्यंत तरी महापालिका प्रशासनाची चिमणी पाडकामाची कोणतीही तयारी दिसत नाही तर पोलीस प्रशासनाने आम्ही सूचनेची वाट पाहत आहोत आणि पोलीस बंदोबस्त लावण्यास तयार असल्याचे म्हटले आहे.

सिध्देश्वर साखर कारखान्याने दाखल केलेली याचिका हायकोर्टाने फेटाळली असून पुढील सुनावणी २० जून रोजी ठेवली आहे. मात्र चिमणीच्या पाडकामाला स्टे दिला नाही. त्यामुळे चिमणी पाडण्याची महापालिकेच्या मुदतीबाबत कोणताही निर्णय दिलेला नाही. त्यामुळे महापालिकेला मुदत संपल्यावर कारवाई करण्याचा अधिकार आहे, तसाच राहिला आहे. आता महापालिका प्रशासन त्यावर काय निर्णय घेणार, याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे. रविवारी रात्री उशिरापर्यंत तरी महापालिकेकडून कोणतीही तयारी नसल्याचे दिसून आले.

### सूचना आल्या की आम्ही बंदोबस्त लावू

चिमणी पाडकामासाठी दिलेले मुदत संपली आहे. हा संवेदनशील विषय आहे. आम्हाला अद्यापपर्यंत कोणत्याही सूचना आल्या नाहीत. सूचना आल्या की– आम्ही बंदोबस्त लावू. कदाचित सोमवारी याबाबत महापालिकेसोबत बैठक होण्याची शक्यता आहे, असे पोलीस आयुक्त राजेंद्र माने यांनी सांगितले.



# राज्यात १३१ तर सोलापुरातील १७ मंदिरांमध्ये ड्रेसकोड

सुराज्य/सोलापूर

**महाराष्ट्र शासनाने वर्ष २०२० मध्ये राज्यातील सर्व शासकीय कार्यालयात वस्त्रसंहिता (ड्रेसकोड) लागू केली आहे. इतकेच नव्हे, तर देशातील अनेक मंदिरे, गुरुद्वारा, चर्च, मशिदी आणि अन्य प्रार्थनास्थळे, खाजगी अस्थापने, शाळा-महाविद्यालय, न्यायालय, पोलीस आदी सर्वच क्षेत्रांत वस्त्रसंहिता लागू आहे. त्याच धर्तीवर मंदिरांचे पावित्र्य, शिष्टाचार, संस्कृती जपण्यासाठी महाराष्ट्र मंदिर महासंघाच्या बैठकीत सोलापूर येथील १७ मंदिरांच्या (एक टक्का) विश्वस्तांनी त्या मंदिरांमध्ये भारतीय संस्कृती अनुरूप वस्त्रसंहिता (ड्रेसकोड) लागू करण्याचा निर्णय घेतला आहे, असे महाराष्ट्र मंदिर महासंघाचे सदस्य राजन बुणगे यांनी सांगितले.**

## महाराष्ट्र मंदिर महासंघाचा खलिता


संबंधित मंदिरांच्या विश्वस्तांनी मंदिराचे पावित्र्यरक्षण आणि भारतीय संस्कृती यांचे पालन व्हावे, या उद्देशाने मंदिरामध्ये भाविकांनी येतांना अंगप्रदर्शन करणारे उत्तेजक तथा तोकडे कपडे घालून येऊ नये, तसेच भारतीय संस्कृतीचे पालन करून मंदिर प्रशासनात सहकार्य करावे, अशा प्रकारचे आवाहन केले. तसा फलकही मंदिराच्या दर्शनी भागात लावण्यात आला आहे. या पत्रकार परिषदेला श्री हिंगुलांबिका देवी देवस्थानचे अध्युक्ष व उद्योजक किशोर कटारे, विश्वस्त श्रीकांत अंबुरे, विजय पुकाळे, स्टेशन रोड येथील शनी मंदिराचे विश्वस्त कलैय्या स्वामी, पंचमुखी हनुमान मंदिराचे विश्वस्त व उद्योजक सत्यनारायण गुर्रम, मल्लिकार्जुन मंदिराचे पुजारी मनोज हिरेहब्बू, जोडबसवण्णा चौक येथील मारुती मंदिराचे विश्वस्त श्रीनिवास गुर्रम, अधिवक्ता मुकुंद कुलकर्णी, नागदेव गुंडला, सनातन संस्थेचे हिरालाल तिवारी आदी उपस्थित होते.

### श्री सिध्देश्वर मंदिर समिती काय निर्णय घेणार?

सोलापूरचे ग्रामदैवत श्री सिध्देश्वर मंदिराच्या मंदिर समितीला वस्त्रसंहितेबाबत (ड्रेसकोड) पत्र देण्यात आल्याचे राजन बुणगे यांनी सांगितले. यापूर्वी श्री सिध्देश्वर मंदिरात ड्रेसकोडबाबत फलक लावण्यात आला होता. पण तो कुणी लावला याचा पत्ता लागला नसल्याने भक्तांमध्ये गदारोळ माजला होता. नंतर तो फलक मंदिर समितीने काढून टाकला, हा भाग वेगळा. आता मात्र महाराष्ट्र मंदिर महासंघाने ड्रेसकोडबाबत पत्र दिल्याने मंदिर काय निर्णय घेणार?, याकडे लक्ष लागले आहे.

### सोलापुरातील या १७ मंदिरात वस्त्रसंहिता

१) श्री हिंगुलाबिका देवी मंदिर, सोमवार पेठ, २) श्री गणेश मंदिर, विजय नगर साईबाबा चौक, ३) श्रीराम मंदिर, पूर्व विभाग, ४) श्री पंचमुखी हनुमान देवस्थान, ५) श्र वैष्णव मारुती मंदिर, ६) श्री शनि मंदिर, रेल्वे स्टेशन रोड, ७) श्री जुने दत्त मंदिर, दत्त चौक, ८) श्री मश्रुम गणपती मंदिर, तळे हिप्परगा, ९) श्री साईबाबा मंदिर, भद्रावती पेठ, १०) श्री काळा मारुती मंदिर, साखर पेठ, ११) श्री मारुती मंदिर, जोडबसवण्णा चौक, १२) श्री नागनाथ मंदिर, शिकला नगर, मजरेवाडी, १३) श्री नागनाथ मंदिर, शशिकला नगर, मजरेवाडी, १४) श्री महालक्ष्मी मंदिर, अक्कलकोट रोड, १५) श्री बह्मानंद गणपती मंदिर, १६) श्री मल्लिकार्जुन मंदिर, बाळीवेस, १७) श्री खंडोबा मंदिर, बाळे. याशिवाय जिल्ह्यातील वटवृक्ष स्वामी मंदिर, अक्कलकोट, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र अक्कलकोट, श्री खंडोबा मंदिर बाळे, श्री भगवंत मंदिर बार्शी या मंदिरांमध्ये वस्त्रसंहिता लागू केली जाणार आहे.



## मोहोळ शहरात डेंगूने घेतला १२ वर्षाच्या बालिकेचा बळी

सुराज्य/मोहोळ




डेंग्यू आजाराने बारा वर्षाच्या बालिकेचा बळी गेल्याची घटना शनिवारी मोहोळ शहरातील सिद्धार्थ नगरात घडली.

मोहोळ नगर परिषदेस महाराष्ट्र राज्यात स्वच्छतेबाबत असलेल्या माझी वसुंधरा अभियानात महाराष्ट्र राज्यात दुसरा क्रमांक मिळाला. ही मोहोळकरांच्या दृष्टीने भूषणावह बाब आहेच यात शंका नाही परंतु इकडे पुरस्काराचा आनंदोत्सव सुरु असतानाच दुसरीकडे १२ वर्षाच्या संस्कृती निरंजन क्षीरसागर या मुलीचा डेंग्यू मुळे जीव जातोय. ही घटना नगर परिषद प्रशासनाला आत्मपरिक्षण करायला लावणारी आहे.

गटारीची साफसफाई करणे कचरा कुंड्या ची विल्हेवाट लावणे . वाहत्या पाण्याला मोकळी वाट करणे व इतर उपाययोजना करणे गरजेचे आहे अन्यथा पावसाळ्यात बिकट परिस्थिती निर्माण होऊ शकते.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



या वरून धरणातील पाण्याची पातळी ओळखू शकते!

## महिलेस शिवीगाळ केल्याप्रकरणी पोलीस पती-पत्नी विरुद्ध गुन्हा दाखल

सुराज्य/सोलापूर

किरकोळ कारणावरून वाद सुरू असताना महिलेला शिवीगाळ करत तिला मनाला लज्जा वाटेल असे कृत्य केल्याप्रकरणी शहर पोलिस बरगुडे व त्याची पत्नी विद्या बरगुडे याच्यावर सलगरवस्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.या बाबत पीडितेने फिर्याद दिली आहे.

पीडिताचे आरोपी विद्या बरगुडे हिच्याशी वाद सूरू होता. त्यावेळी विद्या हिने पीडितेला शिवीगाळ केली. त्याच दरम्यान आरोपी बरगुडे हा तेथे आला.त्यानेही पीडितेला अश्लिल शिवीगाळ करण्यास सुरूवात केली.तसेच घरात घुसून पीडितेच्या घरातील टेबलाची तोडफोड केली.शिवाय पीडितेच्या मनाला लज्जा वाटेल असे कृत्य केले, अशा आशयाची फिर्याद पीडितेने दिली आहे.

या फिर्यादीवरून वरील दोघांवर गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा तपास पोलिस करत आहेत.











## कुटुंब संस्कारित करणे ही देखील मोठी समाजसेवा : औटी

**सोलापूर** : आजच्या काळात विविध कारणावरून कुटुंबं दुभंगत चाललेली आहेत .अशा अवघड पार्श्वभूमीवर जयप्रकाश पोतदार यांनी आपल्या मुला-मुलींना उच्चविद्याविभुषीत तर केलेच शिवाय सुसंस्कारित करून समाजोपयोगी केले. परदेशात जाऊन त्यांनी देशाचे नांव काढले ही सर्वात अभिमानाची बाब आहे, असे मत ज्येष्ठ कवी देवेंद्र औटी यांनी काढले.

हेरिटेज येथे डॉ. व्ही. एम मेडिकल कॉलेज मेडिकल कॉलेजचे निवृत्त कार्यालयीन अधीक्षक जयप्रकाश पोतदार यांचा पंचाहत्तरी निमित्ताने सपत्नीक सत्कार करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. प्रास्ताविक महिंद्र पोतदार यांनी तर सूत्रसंचालन वीरेंद्र पोतदार यांनी केले.याप्रसंगी कुंभारी येथील अश्विनी मेडिकल कॉलेजच्या माजी अधिष्ठाता डॉ. माधवी रायते, डॉ.निळकंठ पोतदार, आर.आय. तळे, ॲड. वाय. आर. पांढरे, बिपीन भंडारे, स्वामी, भालेकर, दीपक पवार, सुहास तळभंडारे आदींसह मान्यवर उपस्थित होते. बी. टी. जोशी, डि. टी. जोशी, रविंद्र नायडू, शशिकांत घोलप यांनी चित्रफित व फोनद्वारे शुभेच्छा दिल्या.

## एसटी बसवर दगड मारून काच फोडली ; दोघांवर गुन्हा

**सोलापूर** : एसटी बसवर दगड मारून काच फोडल्याप्रकरणी दोन अनोळखी इसमानविरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना ९ जून रोजी रात्री नऊ ते साडेनऊ वाजण्याच्या दरम्यान घडली.

फिर्यादी गोविंद अंकुश मुगुटराव (वय-३६,रा.सांगी मार्डी) हे तुळजापूर कडून पुण्याकडे जात असताना जुना पुना नाका येथे काही प्रवासी सोडून एसटी स्टँड कडे जात होते. त्यावेळी जय मल्हार चौक येथे पाठीमागून येणाऱ्या मोटार सायकल चालकाने एसटी क्र.एमएच.२०.जीसी.३११९ यावर दगड मारून काच फोडली.तसेच तेथे डिव्हायडरवर उभे असलेल्या एका व्यक्तीने फिर्यादीच्या कानाखाली मारले असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. घटनेचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल चौगुले हे करीत आहेत.

## मागील भांडणावरून मारहाण; चौघांवर गुन्हा

**सोलापूर** : मागील भांडणाच्या कारणावरून मारहाण केल्याप्रकरणी चार जणांविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी व्यंकटेश लक्ष्मण वड्डेपल्ली (वय-२३,रा.नीलम नगर भाग ३) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून रामकृष्ण श्रीनिवास मेरगु (रा.नेताजी शाळेसमोर),वेणू श्रीनिवास येलदंडी (रा.नवीन विडी घरकुल) यांच्यासह दोन अनोळखी मानविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.ही घटना ७ जून रोजी सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास नटराज चौक एमआयडीसी येथे घडली.फिर्यादी हे नटराज चौक येथे थांबले होते.त्यावेळी त्यांच्या ओळखीचे वरील संशयित आरोपी यांनी मागील भांडणाचा राग मनात धरून फिर्यादी यांना लय मस्ती आली आहे असे म्हणून दोन अनोळखी इसमाने चिडून जाऊन हाताने व लाथा बुक्क्यांनी मारहाण केली.त्यानंतर रामकृष्ण मेरगू याने लोखंडी वस्तूने फिर्यादी यांच्या डोळ्यावर मारून जखमी करून दुखापत केली.त्यानंतर वेणू यलदंडी याने फिर्यादी यांना लाकडी दांडक्याने मारून फिर्यादी यांचे मामा श्रीनिवास व मामी राधिका तसेच काकू हे भांडण सोडवण्यासाठी आले असता,त्यांना देखील लाथा बुक्क्यांनी मारहाण केल्याचे फिर्यादित म्हटले आहे. घटनेचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल गायकवाड हे करीत आहेत.

## महिलेसह तिच्या मुलीशी अश्लील कृत्य केल्याप्रकरणी आठ जणांवर गुन्हा दाखल

**सोलापूर** : महिलेकडे व तिच्या मुलीकडे अश्लिल नजरेने पाहत मुलीशी अश्लील कृत्य केल्याप्रकरणी आठ जणांवर बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत पीडितेने फिर्याद दिली आहे.पीडितेचा पती आपल्या मुलांसह बाहेर गावी गेला होता.ही संधी साधून आरोपी व्यंकटेश माकणे हा ९ तारखेला रात्री पीडितेच्या घराचा दरवाजा वाजवून दार उघड असे म्हणू लागला.पण पीडिता ही घाबरून दार न उघडता घरात बसली.ही घटना पीडितेने सकाळी आपल्या पतीला फोनव्दारे सांगितली.पीडितेचे पती आल्यानंतर या घटनेचा जाब विचारण्यासाठी गेल्यानंतर आरोपी व्यंकटेशची पत्नीने पीडितेला शिवीगाळ करण्यास सुरूवात केली.आरोपी व्यंकटेश याने पीडितेला घरातून हात धरून ढकलून दिले,अशा आशयाची फिर्याद दिली आहे.या फिर्यादीवरून व्यंकटेश माकणे,त्याची पत्नी,मुलगा,प्रकाश राम शिंगे,बसवराज जमादार व इतर तीन अनोळखी इसमांवर गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचा तपास पोलिस करत आहेत.

## अल्पवयीन मुलीचा विनयभंग; तरुणावर गुन्हा

**सोलापूर** : मागील दोन महिन्यांपासून अल्पवयीन १७ वर्षाच्या मुलीचा पाठलाग करत तिला रस्त्यात आडवून माझ्याशी बोलत जा म्हणत तिचा विनयभंग केल्याप्रकरणी तरुणावर गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत पीडितेच्या आईने फिर्याद दिली आहे. या प्रकरणी शामकुमार अंबादास माचर्ला ( रा. सोलापूर) याच्यावर पोक्सोन्वये गुन्हा दाखल झाला आहे.

पीडिता ही एक वर्षापासून एका दुकानात कामाला जात होती. आरोपी हा पीडितेचा दोन महिन्यापासून पाठलाग करत होता. हि बाब पीडितेने आपल्या कुटुंबियांना सांगितली होती. त्यानंतर पीडितेच्या कुटुंबियांनी आरोपीच्या आईला या घटनेची माहिती दिली. त्यानंतरही आरोपीने पुन्हा पीडितेचा पाठलाग सुरू ठेवला. शुक्रवारी पीडिता घरी जात असताना आरोपीने तिला दुचाकीवरून पाठलाग करत तिला रस्त्यात अडवले.

त्यानंतर मला तुझ्याशी बोलायचे आहे, जर नाही बोलली तर मी जीव देतो असे म्हणाला. यामुळे पीडितेने या घटनेची माहिती कुटुंबियांना सांगितली. याप्रकरणी पीडितेच्या आईच्या फिर्यादीवरून आरोपीवर गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा तपास पोलिस करत आहेत.

# सत्तर फूट रोडवर वृद्धाला क्रेनने चिरडले

**सुराज्य/सोलापूर**

**शहरातील सत्तर फूट रोड येथील माधव नगर येथे एका क्रेनच्या धडकेत पादचारी ठार झाला. विश्वनाथ धोंडीबा जाधव (वय – ७०, रा. भारतरत्न इंदिरानगर) असे अपघातात मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तीचे नाव आहे. ही घटना रविवारी सकाळी घडली.**



रविवारी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास विश्वनाथ हे चालत घराकडे निघाले होते. त्यावेळी एमआयडीच्या दिशेने जाणारा एमएच-१३-डिएम ५३८२ ह्या क्रमांकाचा क्रेनने धडक दिली. या अपघातात विश्वनाथ हे गंभीर जखमी झाले. त्यांना शासकीय रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. अपघाताची घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे.

दरम्यान, घटना घडताच जेलरोड पोलिस ठाण्याचे हवालदार मस्के हे घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी रुग्णसेवक लादेच्या मदतीने विश्वनाथ यांना हॉस्पिटलमध्ये दाखल केले. या अपघाताची नोंद जेलरोड पोलिसात झाली. पोलिसांनी क्रेनचा चालक अस्लम राजेसाब नदाफ (रा. स्वामी विवेकानंद नगर, मजरेवाडी) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. पुढील तपास फौजदार बादोले करीत आहेत.

## उजनी येथे गळफास घेतलेल्या तरुणाचा उपचारादरम्यान मृत्यू

**सोलापूर** : नशेत गळफास घेतलेल्या सागर राजेंद्र सुरवसे (वय २५ रा.उजनी ता.माढा) हा सोलापुरातील शासकिय रुग्णालयात उपचार घेताना रविवारी दुपारी मयत झाला.

तो बुधवारी दुपारच्या सुमारास दारूच्या नशेत घरातील छताच्या पंख्याला साडीने गळफास घेतला होता. त्याला फासातून सोडवून कुर्डूवाडी येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकिय रुग्णालयात अप्पासाहेब (भाऊ) यांनी दाखल केले होते. उपचारादरम्यान तो रविवारी मयत झाला . अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे .

## दोन समाजात तेढ निर्माण होईल अशी स्टोरी सोशल मीडियावर ठेवल्याप्रकरणी तरुणावर गुन्हा

**सोलापूर** : दोन समाजात तेढ निर्माण होईल अशी स्टोरी सोशल मीडियावर ठेवल्याप्रकरणी तरुणावर गुन्हा दाखल झाला आहे.याप्रकरणी मोहसीन गुलाब बागवान मैंदर्गीकर (वय-३०,रा. सिध्देश्वर पेठ) यांनी जेलरोड पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून शिव दहीहंडे (वय-३०,रा. चौपाड) याच्यावर गुन्हा दाखल झाला आहे.

फिर्यादी सोशल मीडियावर तपासताना आरोपीने आपल्या सोशल मीडियावर धार्मिक भावना दुखावणारा व्हिडीओची स्टोरी ठेवली होती.यामुळे दोन समाजात तेढ निर्माण होईल असे कृत्य केले.या प्रकरणी आरोपीवर अजामीनपात्र गुन्हा दाखल झाला आहे.त्याला अटक करण्यात आली असून त्याला सोमवारी न्यायालयात हजर केले जाणार आहे.या घटनेचा तपास पीएसआय शशिकांत लोंढे करत आहेत.

## मेंबरशिप घेण्यास भाग पाडून महिलेस ६५ हजाराला फसवले ; तिघांवर गुन्हा

**सुराज्य/सोलापूर**

मेंबरशिप घेण्यास भाग पाडून ६५ हजारांची फसवणूक केल्याची घटना उघडकीस आली आहे. फिर्यादी पूजा प्रसाद कुलकर्णी (वय-४६,रा.जानकी नगर जुळे सोलापूर) व त्यांचे पती डी मार्ट येथे सामान खरेदी करण्यासाठी गेले होते.तेथे निखिल नावाचा इसम भेटला व त्याने आमच्याकडे एक स्कीम आहे.तुम्ही थोडे माझे ऐका असे म्हणून त्याने अडेन्टा क्लब अँड रिसॉर्ट येथे पूनम राठोड या मॅनेजर असून,तुम्हाला भारत व परदेशात कोठेही प्रवास करता येईल व त्यांच्या या कंपनीमार्फत चांगला फायदा होईल असे पटवून सांगितले.त्यावेळी फिर्यादी व फिर्यादीच्या पती असे दोघेजण सूर्या हॉटेल येथे गेले तेथे पुनम राठोड व सुवर्णा गायकवाड यांनी कंपनी बद्दल फायदे पटवून देऊन फिर्यादी यांचा विश्वास संपादन करून कंपनीचे मेंबरशिप घेण्याकरिता ६५ हजार रुपये भरा असे सांगितले.त्यावेळी फिर्यादी यांनी ३३ हजार रुपये रोख रक्कम व बजाज फायनान्स कार्ड वरून बाकीची रक्कम कंपनीच्या अकाउंटवर भरली.

परंतु आठ दिवसांनी फिर्यादी यांनी पुनम राठोड सुवर्णा गायकवाड व निखिल यांच्या मोबाईलवर फोन करून प्रवासा संदर्भात विचारणा केली असता,त्यांनी फोन उचलला नाही.त्यावेळी फिर्यादी सोबत संपर्क करण्याचे त्यांनी बंद करून कुठल्याही प्रकारची माहिती दिली नाही. दरम्यान फिर्यादी यांनी सूर्या हॉटेल येथे जाऊन विचारणा केली असता,तेथेही कोणाला माहिती मिळाली नाही त्यावरून फिर्यादी यांची खात्री झाली की आपली फसवणूक झाली आहे.याप्रकरणी पूजा कुलकर्णी यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून,त्यांच्या फिर्यादीवरून पुनम राठोड,सुवर्णा गायकवाड व निखिल (रा. अडेन्टा प्लॉट नं.१,विनायक सीएचएस लिमिटेड,रिद्धी बिल्डिंग समोर,एमजी रोड,बोरवली,मुंबई) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.



## एनबीके फॅन्सच्यावतीने अन्नदान

**सुराज्य/सोलापूर**

पूर्व भागातील सुप्रसिद्ध सुनील नगर, कामगार वस्ती, राम मंदिर समोर येथे सोलापूर शहर एनबीके फॅन्स अभिमान संघमच्यावतीने अभिनेते आमदार नंदमुरी बालकृष्णा यांची ६३ व्या वाढदिवसानिमित्त अन्नदान कार्यक्रम घेण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी महापौर महेश कोठे, शशिकांत केंची, सोलापूर शहर एनबीके फॅन्स अभिमानचे अध्यक्ष जर्नादन इंजामुरे, सोलापूर शहर एनबीके फॅन्स अभिमानचे उपाध्यक्ष रवि चिट्टीपल्ली, खजिनदान श्रीनिवास लकशेट्टी, एनटीआर शहर अध्यक्ष तिपण्णा गणेरी, सह.उपाध्यक्ष नागेश गडगी, सह.खजिनदार श्रीपाद चिंता, श्रीनिवास कोंडा, सोमनाथ वंगा, नारायण गजेली, राजेश इराबत्ती, राजू बिंगी यांच्या सहकार्याने कार्यक्रम यशस्वी झाला.

यावेळी एनटी आर शहर अध्यक्ष तिपण्णा गणेरी, सह.उपाध्यक्ष नागेश गडगी, सह.खजिनदार श्रीपाद चिंता, श्रीनिवास कोंडा, राजेश इराबत्ती, राजू बिंगी रामुलू पोतू, नदाल, कनकी आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रेणूका बुधाराम यांनी केले तर आभार प्रदर्शन नागेश गडगी यांनी मानले.

## बनावट शपथपत्र तयार करून ४६ लाखांची फसवणूक

**सुराज्य/सोलापूर**

फिर्यादी भंगारेव्वा महादेव बागदुरे (वय-९०,रा.नरेंद्र नगर सैफुल) यांचे पती यांनी खरेदी केलेले हिंदुस्तान युनिलिव्हर लिमिटेड या कंपनीचे ५१८० शेअर्स किंमत ९२ लाख ५९ हजार ७६८ रुपयांचे असून,त्यापैकी फिर्यादी व फिर्यादीच्या मुलगा चंद्रशेखर याच्या हिश्याला येणारी अंदाजे रक्कम ४६ लाख २९ हजार ८८४ रुपये रकमेची फिर्यादीच्या पतीच्या व फिर्यादीच्या परवानगीशिवाय बनावट शपथपत्र व बॉन्ड तयार करून ते स्वतःच्या नावे हस्तांतर करून फिर्यादी यांची फसवणूक केली आहे.ही घटना सप्टेंबर २०२० दरम्यान घडली. याप्रकरणी बागदुरे यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून,त्यांच्या फिर्यादीवरून राकेश उर्फ सिध्देश्वर राज शेखर बागदुरे (वय-३४,रा.उत्तर कसबा) व शिवानंद अंबण्णा नागणसुरे (रा.शेळगी) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक बंडगर हे करीत आहेत.

## शहरातील नागरिकांना सोयी सुविधा न देता फक्त कर वसुलीचा बडगा

**सुराज्य/सोलापूर**

▶▶ प्रशासकीय राजवटीत महानगरपालिकेचा अंदाधुंद कारभार

▶▶ माजी गटनेते आनंद चंदनशिवे यांचा आरोप !

शहरातील नागरिकांना (करदात्यांना) सोयी - सुविधा न देता फक्त कर वसुलीचा बडगा सोलापूर महापालिका प्रशासनाकडून उचलायला जात आहे. प्रशासकिय राजवटीत महानगरपालिकेचा अंदाधुंद कारभार सुरू असल्याचा आरोप माजी गटनेते आनंद चंदनशिवे यांनी केला आहे.

सोलापूर महानगरपालिकेच्या माध्यमातून कोणत्याच भागामध्ये नवीन रस्ते करणे, भूमिगत गटारी व लाईट आदी सुविधा करणे हे महापालिकेचे प्रथम कर्तव्य असताना सुद्धा महानगरपालिकेची प्रशासकिय राजवट लागू झाल्यापासून सोलापूरच्या जनतेची कुचंबणा होत आहे. एकीकडे टॅक्स वसुलीसाठी जोरदार मोहीम महानगरपालिकेने घेतली असून दुसरीकडे शहरांमध्ये विचित्र परिस्थिती निर्माण झाली आहे.



**या आहेत शहरातील समस्या**

विस्कळीत पाणीपुरवठा, कचऱ्याचे साम्राज्य, रस्त्यात खड्डे की खड्ड्यात रस्ता, नव्याने बसविलेल्या लाईट अर्धा अंधार अर्धा उजेड, तुडुंब भरलेल्या ड्रेनेज लाईन मुळे जागोजागी रस्त्यावर घाण पाण्याचे साम्राज्य, जन्म - मृत्यू या विभागातील अंदाधुंद कारभार असून वेळेमध्ये दाखले न मिळत नसल्याने नागरिकांची तक्रार, १ ते ८ विभागीय कार्यालयाच्या माध्यमातून किरकोळ मेंटेनन्सची कामे होत नसल्याची नागरिकांची तक्रार, विविध कार्यालयामध्ये अधिकाऱ्यांची अनुपस्थिती असे विविध प्रश्न आहेत.

एकीकडे टॅक्स वसूल करा म्हणून महापालिका प्रशासक तथा आयुक्त यांनी सोलापूर महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना फर्मान सोडलेले आहे. आणि दुसरीकडून सोलापूर शहरातील करदात्यांची विकासाची कामे होत नसल्यामुळे नागरिकांमधून तीव्र नाराजी आहे. याची गांभीर्याने दखल घेऊन सोलापूर महानगरपालिका आयुक्त यांनी महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त, सहाय्यक आयुक्त आणि विविध विभागांतील अधिकाऱ्यां समवेत तातडीने बैठक घेऊन सोलापूर शहरातील विकास कामे आणि समस्या दूर करण्यासाठी निर्णय घ्यावा, असे माजी गटनेते आनंद चंदनशिवे यांनी म्हटले आहे.

## कोळेगाव येथे चार चाकी वाहनाच्या धडकेने दुचाकीवरील निवृत्त कर्मचारी ठार

**सुराज्य/सोलापूर**

वेगाने जाणाऱ्या चार चाकी वाहनाच्या धडकेने दुचाकी वरील बीएसएनएल मधील निवृत्त कर्मचारी गंभीर जखमी होऊन उपचारा दरम्यान मयत झाले. हा अपघात कोळेगाव (ता.मोहोळ) येथे रविवारी सकाळच्या सुमारास घडला. यशवंत श्रीरंग माने (वय ६५ रा.कोळेगाव) असे मयत झालेल्या इसमाचे नाव आहे . ते आज सकाळी आपल्या दुचाकीवरून मोहोळ येथे भाजी घेऊन आपल्या घराकडे निघाले होते . कोळेगाव जवळ अनोळखी चार चाकी वाहनाच्या धडकेने ते गंभीर जखमी झाले होते. त्यांना उपचारासाठी आकाश (मुलगा) यांनी सोलापुरातील शासकिय रुग्णालयात दाखल केले असता ते दुपारी चार वाजेच्या सुमारास मयत झाले. मयत यशवंत माने यांच्या पश्चात पत्नी आणि ३ मुले असा परिवार आहे . या अपघाताची प्राथमिक नोंद तालुका पोलिसात झाली आहे .

## चाकूने मारून घेतल्याने तरुण जखमी

**सोलापूर** : औज मंद्रूप (ता.दक्षिण सोलापूर ) येथे राहणाऱ्या सतीश अर्जुन बनसोडे (वय २८) याने राहत्या घरात गळ्यावर चाकूने मारून घेतल्याने जखमी झाला . ही घटना रविवारी पहाटे दीड वाजेच्या सुमारास घडली. त्याला उपचारासाठी पत्नी यांनी सोलापुरातील शासकिय रुग्णालयात दाखल केले. घरगुती वादातून त्याने हा प्रकार केला. अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

## ● निधन वृत्त

### सहायक फौजदार कैलास हरिहर



**चिखली** : पंढरपूर तालुक्यातील करकंब पोलिस ठाण्यात कार्यरत असलेले सहायक पोलिस फौजदार कैलास सुभेदार हरिहर (वय ५०) यांचे हृदयविकाराच्या झटक्याने शनिवार दि. १० रोजी निधन झाले.

करकंब पोलिस ठाणे येथे त्यांना अचानक हृदयविकाराचा तीव्र झटका आला. त्यांना त्यांच्या सहकाऱ्यांनी तातडीने खाजगी रुग्णालयात दाखल केले होते. परंतु त्यांच्या प्रकृतीत काय सुधारणा झाली नाही. अखेर शनिवारी त्यांना मृत्यूने कवटाळले. करमाळा तालुक्यातील राजुरी येथील त्यांच्या मुळ गावी स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिव देहावर शासकिय इतमामात मानवंदना देत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पाश्चात्य पत्नी, दोन मुले, भाऊ, बहिणी, आई, वडील असा परिवार आहे.

### दत्तात्रय भालेराव



**अकलूज** : अकलूज येथील दत्तात्रय निवृत्ती भालेराव यांचे वृद्धापकाळाने निधन झाले.ते ९२ वर्षांचे होते.त्यांच्या पश्चात तीन मुले,सुना,नातवंडे,एक विवाहित मुलगी,जावाई असा परिवार आहे.

### कलावती जांभळे

**सोलापूर** : कलावती हरिदास जांभळे (वय ९४) यांचे दि.७ जून रोजी सकाळी सोलापूर येथील जुनी मिल कंपाऊंड, रहात्या घरी वृध्दापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात चार मुली,पाच मुले, सुना, नातु, नातसुना व नातवंडे, परतुंडे असा मोठा परिवार आहे. आमदार सुभाष देशमुख यांचे तत्कालीन स्वीय्य सहाय्यक सुधाकर जांभळे यांच्या त्या मातोश्री होत.

# नगरपंचायतींना अनुदान सुरु करावे

## आ रणजितसिंह मोहिते पाटील यांची देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी

**सुराज्य/अकलूज**

उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील ग्रामविकास मंत्री असताना त्यांनी पालखी मार्गावरील मुक्काम व विसाव्याच्या गावांना विशेष अनुदान सुरू केले होते . अगदी त्याचप्रमाणे पालखी मार्गांवरील नव्याने निर्माण झालेल्या अकलूज नगरपरिषद , महाळुंग -श्रीपुर , नातेपुते आणि माळशिरस या नगरपंचायतींना देखील अनुदान सुरू करण्यात यावे अशी मागणी आमदार रणजितसिंह मोहिते पाटील यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली असल्याची माहिती आमदार रणजितसिंह यांनी सांगितली .

दोन्ही संतांच्या पालखी मार्गांवर मुक्कामाच्या ठिकाणी व पालखी विसाव्याच्या ठिकाणी लाखोंच्या संख्येने उपस्थित असणाऱ्या वारकऱ्यांना विविध सेवा सुविधा पुरवाव्या लागतात .त्याशिवाय पालख्या निघून गेल्यानंतर या गावांमध्ये आरोग्याच्या दृष्टीने निगा ठेवावी लागते .यासाठी माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांनी ते स्वतः ग्राम विकास मंत्री असताना पालखी मार्गावरील मुक्कामाच्या गावासाठी १० लाख व ज्या ठिकाणी पालखीचा विसावा असतो त्या गावासाठी ५ लाखांचा निधी पालख्या येण्यापूर्वी वितरित करण्याचा निर्णय घेतला होता तो आजतागायत अमलात आणला जात आहे .त्यानंतर संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी मार्गावर असणाऱ्या नातेपुते व माळशिरस येथे नव्याने नगरपंचायती स्थापित झाल्या आहेत .या ठिकाणी प्रत्येकी ४० लाख रुपये सेवा सुविधा अनुदान मिळण्याची मागणी आमदार रणजितसिंह मोहिते पाटील यांनी केली आहे . त्याशिवाय संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांच्या पालखी मार्गावर असणाऱ्या अकलूज येथे नव्याने नगरपरिषदेची निर्मिती झाली आहे .येथे संत तुकोबांची पालखी मुक्कामी असते .त्यामुळे अकलूज साठी ७५ लाखांचे अनुदान मिळावे अशी आमदार रणजितसिंह यांची मागणी आहे.

येथे पालखीचा विसावा व परतीच्या प्रवासाचा मुक्काम देखील असतो या ठिकाणीही ४० लाखांचा निधी मिळावा असे आमदार रणजितसिंह मोहिते पाटील यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठवलेल्या निवेदनात नमूद केले आहे .उपमुख्यमंत्री यासंदर्भात सकारात्मक निर्णय घेतील असे आमदार रणजितसिंह मोहिते पाटील यांनी सांगितले .

# चंद्रभागा आपली आई तिला प्रदूषित करू नका : स्वामी

## स्वच्छ भारत मिशन ग्रामीण व जल जीवन मिशनची कार्यशाळा

सुराज्य/सोलापूर

**जिल्ह्यातील स्वच्छ भारत मिशन ग्रामीण व जलजीवन मिशन साठी १५ व्या वित्त आयोगांतर्गत ६० टक्के निधीचा समावेशाच्या शासनाच्या तरतुदी पूर्ण केल्याशिवाय गावच्या आराखड्यास मान्यता देण्यात येणार नाही, अशा स्पष्ट सुचना शासनाने दिल्या आहेत. असे स्पष्ट करत चंद्रभागा नदी आपली आई आहे. तिला प्रदूषित करू नका, असे भावनिक आवाहन जिल्हा परिषदेचे प्रशासक तथा सिईओ दिलीप स्वामी यांनी केले.**



सोलापूर येथील हुतात्मा स्मृती मंदिर येथे स्वच्छ भारत मिशन ग्रामीण व जल जीवन मिशन अंतर्गत गटविकास अधिकारी, उप अभियंता, शाखा अभियंता, ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकारी, विस्तार अधिकारी, यांची जिल्हास्तरीय कार्यशाळा घेण्यात आली.

या कार्यशाळेत जिल्हा परिषदेचे प्रशासक दिलीप दिलीप स्वामी यांनी मार्गदर्शन केले. या वेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदिप कोहिणकर, पाटोदेचे सरपंच भास्करराव पेरे- पाटील, कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) इशाधीन शेळकंदे ,उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) अमोल जाधव ,ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता उपस्थित होते .

पुढे बोलताना स्वामी म्हणाले की, सोलापूर जिल्ह्यातील स्वच्छ भारत मिशन ग्रामीण ३० टक्के व जलजीवन मिशन साठी ३० टक्के निधी १५ वा वित्त आयोगांतर्गत सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन व सामुहिक शौचालयासाठी तरतुद केली तरच गावांच्या आराखड्यास मान्यता देण्यात येईल.

नोकरी मुळे इज्जत आहे. या नोकरीशी कोणी बेईमानी करत असेच तर चुकीचे आहे. गावात न जाता नोकरीशी बेईमानी करू नका. जे लोक वेळेवर जातात त्यांना टोमणे मारून तुला काय बक्षीस मिळणार का? असेही विचारले जाते. हे चुकीचे असल्याचे सिईओ स्वामी यांनी खडसावून सांगितले.

पालखी मार्गावर भाविकांना चांगल्या सुविधा द्या. कचरा मुक्त अभियान चांगले पध्दतीने राबवा. प्लास्टीक व्यवस्थापन करा, जे लोक वृक्ष लावणार नाहीत त्यांना कुठलेही लाभ दिले जाणार नाही.आषाढी यात्रा तोंडावर आली आहे. पालखी मार्गावर १२ हजार वृक्ष लागवडीचे नियोजन करा. वृक्ष लागवड जतन व संवर्धन करा. जे कुटूंबे वृक्ष लागवड करणार नाहीत त्या कुटूंबांना कुठलाही लाभ मिळणार नाही.

घरकुला वरून अतिरिक्त सिईओ संदीप कोहिणकर या वेळी बोलताना म्हणाले की, नगर जिल्ह्यात १४ हजार घरकुले पुर्ण होतात. आपणच मागे का ? जलजीवन मिशन ची ग्रामपंचायतीची जबाबदारी लक्षात घ्या. जलजीवन मिशन फलक दर्शनी भागात लावावा, असेही कोहिणकर यांनी सांगितले.

या प्रसंगी ग्रामसेवकांमधून ग्रामविकास अधिकारी व विस्तार अधिकारीपदी पदोन्नती दिल्याबद्दल ग्रामसेवक संघटनेच्यावतीने सिईओ दिलीप स्वामी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी इशाधिन शेळकंदे यांचा तुळशीहार घालून ग्रामसेवक संघटनेचे जिल्हाध्यक्ष शरद भुजबळ यांनी गौरव केला. वाढदिवसाचे औचित्य साधून अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर व प्रकल्प संचालक अमोल जाधव यांचा ग्रामसेवक संघाचे तात्यासाहेब पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.



## माळेवाडी बोरगाव पाणी पुरवठा योजनेचे पूजन

**श्रीपूर** : माळेवाडी बोरगाव गावच्या जल जीवन मिशन योजने अंतर्गत ग्रामीण पाणीपुरवठा योजना माळेवाडी बो. पाणीपुरवठा योजनेच्या विहिरीच्या जागेचे भूमिपूजन भाजप प्रदेश कार्यकारणी सदस्य राजकुमार पाटील व माजी प.स.सदस्या कुमुदिनी पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मशीनची पूजा माळेवाडी बो. सरपंच सीमा संभाजी कुदळे व ग्रामपंचायत सद्स्य संभाजी कुदळे याच्या हस्ते करून कामाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी ग्रामपंचायत सदस्य वर्षा कुदळे, राहुल पांढरे, संभाजी कुदळे, राजकुमार पांढरे,अमित कुदळे, राजू पिसे,विशाल कुदळे, श्रीराम पांढरे, बाळासो पांढरे, ठेकेदार श्रावणी कन्स्ट्रॅक्शनचे तोडकरी, विहरीसाठी २ गुंठे जमीन बक्षीस देणारे विकास पाटील उपस्थित होते. अगोदर हि योजना ५८.५० लाख रुपये मंजूर होती. ती आत्ता राजकुमार पाटील यांच्या प्रयत्नातून साधारण ९० लाख पर्यंत मंजूर करून घेतली व आज या योजनेचा कामाचा शुभारंभ करण्यात आला.दोन पाणीपुरवठ्याच्या टाक्याच्या माध्यमातून पाईप टाकून माळेवाडी बोरगाव गावाला पाणीपुरवठा केला जाणार आहे.



## पाण्यासाठी शिक्षक सोसायटीतील नागरिकांचा उपोषणाचा इशारा

**कुर्डूवाडी** : कुर्डुवाडीतील टेंभुर्णी रोडवरील शिक्षक सोसायटीमध्ये पिण्याचे पाणी, रस्ता आदी समस्यांकडे नगरपरिषद वारंवार दुर्लक्ष करीत असल्याने दि.१५ जून रोजी कुर्डूवाडी येथील प्रांत कार्यालयासमोर शिक्षक सोसायटीतील ज्येष्ठ नागरिक व नागरिक उपोषण करणार असल्याचा इशारा दिला आहे. उपविभागीय अधिकारी माढा यांना दिलेल्या निवेदनामध्ये टेंभुर्णी रोडवरील शिक्षक सोसायटीतील नागरिकांना त्यांच्या हक्काचा टाउन प्लॅनिंग मंजुर वहीवाटीचा रस्ता अजुनही झालेला नाही. त्यामुळे अंत्यसंस्कारासाठी तसेच विद्यार्थ्यांना शाळेत जायला खुप अडचणी येत आहेत.बहुचर्चित भुयारी गटारींचेही कामही अपूर्ण आहे. गेले महीनाभर पिण्याच्या पाण्याचा पुरवठाही अस्वच्छ येत आहे. त्यामुळे नागरीकांचे आरोग्यही धोक्यात आले आहे. नगरपालिका प्रशासनास वारंवार कळवुनही न.पा. प्रशासनाकडून काहीच कामे करीत नसल्याने शिक्षक सोसायटीतील नागरिक उपविभागीय अधीकारी कार्यालया समोर उपोषण करण्याचा असल्याचे निवेदन देण्यात आले आहे.१५ जून रोजी प्रांत ऑफिस समोर सोसायटीतील जेष्ठ महिलांसहीत बहुसंख्य नागरिक उपोषणास बसणार असल्याचे निवेदनाद्वारे इशारा दिला आहे. यावेळी किरण गोडसे, दिपक काकडे, अतुल थिटे, विठ्ठलराव कुलकर्णी, सुनिल शिंदे, दामाजी टोणपे, पप्पु बनसोडे महेश ढेपे, अशोक ओहोळ, पोपट शिंदे, मयुर काळे आदी उपस्थित होते.

## लक्ष्मण माळी यांना राजर्षी शाहू प्रेरणा पुरस्कार जाहीर



**सोलापूर** : धम्म भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने देण्यात येणारा कोल्हापुरातील राजर्षी शाहूंच्या समतावादी नगरीतील नावाजलेल्या मानाच्या व सन्मानाच्या राजर्षी शाहू प्रेरणा पुरस्कारासाठी लक्ष्मण भागवत माळी (कळमण) यांची निवड करण्यात आल्याची माहिती पत्रकार परिषदेत धम्म भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या अध्यक्षा करुणा विमल यांनी दिली.राजर्षी शाहूंच्या विचारांना आदर्श मानून सामाजिक, शैक्षणिक, राजकीय व जनसेवेच्या विविध क्षेत्रात अतिशय उल्लेखनीय कार्य असलेले लक्ष्मण भागवत माळी यांना सामाजिक बांधिलकी मानून ते करीत असलेल्या कार्याची दखल घेऊन हा पुरस्कार जाहीर केल्याचे करुणा विमल यांनी सांगितले.

धम्म भवन चॅरिटेबल ट्रस्ट ही संस्था तथागत बुद्ध,छत्रपती शिवाजी महाराज, लोकराजे राजर्षी शाहू महाराज, महात्मा जोतीराव फुले,माता सावित्रीमाई फुले, डॉ. महामानव बाबासाहेब आंबेडकर, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांना पुढे घेऊन जाण्यासाठी अभिप्रेत असणाऱ्या प्रबोधनाच्या चळवळीमध्ये कार्यरत आहे.राजर्षी शाहू प्रेरणा पुरस्कार- २०२३ या पुरस्काराचे स्वरूप मानाचा फेटा,सन्मानचिन्ह आणि तीन हजार रुपयांची पुस्तके असून या पुरस्काराचे वितरण रविवार दि. १८ जून रोजी दुपारी १२ वा. राजर्षी शाहू स्मारक भवन,कोल्हापूर येथे होणाऱ्या राजर्षी राष्ट्रीय बाल लघू चित्रपट महोत्सवात आमदार सतेज पाटील, जयंत आसगावकर,विद्रोही शाहीर संभाजी भगत, प्रा.बाबुराव गुरव, अभिजित बिचुकले, प्रा.टी. के.सरगर, विजया कांबळे, छाया पाटील, दिग्दर्शक माहेश्वर टेतांबे, फोटोग्राफर राजवीर जाधव, अमर पारखे यांच्या उपस्थितीत होणार आहे. ४५५० प्रस्तावामधून वरील निवड करण्यात आली आहे.


# मोहोळ तालुक्यातील शाळांपुढे स्काऊट गाईड गणवेशाचा पेच

सुराज्य/चिखली

पहिली ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना समान गणवेश देण्याचा हट्ट सोडून दोन्ही गणवेशांची जबाबदारी पुन्हा शाळा व्यवस्थापन समितीवर सोपविण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने घेतला आहे. परंतु, त्यातील एक गणवेश स्काऊट-गाईडसारखा द्यावा, असे स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे शाळा सुरू होण्यास केवळ चार दिवसांचा अवधी असताना स्काऊट-गाईडसारखा गणवेश आणायचा कुठून? असा नवा पेच शाळांपुढे निर्माण झाला आहे.

राज्याचे शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी 'एक राज्य एक गणवेश' योजनेअंतर्गत राज्यातील शासकीय आणि अनुदानित शाळांमधील विद्यार्थ्यांना एकाच रंगाचा गणवेश देण्याची घोषणा केली होती. मात्र, अनेक शाळांनी गणवेश वाटपाची प्रक्रिया सुरू केल्याने नव्या शासकीय योजनेमुळे त्यात अडचणी निर्माण होण्याची चर्चा सुरू झाली. त्यानंतर शासनाकडून दोन गणवेशांऐवजी एक गणवेश देण्याचा निर्णय झाला.त्यानंतर महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेने तीनशे रुपयांचा एक गणवेश शाळा व्यवस्थापन समितीने देण्याचे आदेश दिले. तर, शासन स्तरावरून सूचना मिळाल्यानंतर उर्वरित एका गणवेशाबाबत पुढील कार्यवाही करण्याबाबत स्पष्ट करण्यात आले होते. त्यानंतर गुरुवारी नवा शासन निर्णय प्रसिद्ध करून स्काऊट आणि गाईड विषयास अनुरूप गणवेश शाळा व्यवस्थापन समितीमार्फत देण्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. एका आठवड्यात दोन परिपत्रके आल्यामुळे आणि तुटपुंज्या रकमेत दोन वेगवेगळे गणवेश खरेदी करावे लागणार असल्यामुळे शाळांच्या स्तरावर मोठा संभ्रम निर्माण झाला आहे. स्काऊट-गाईडचा शालेय गणवेशाशी संबंध जोडणे अनाकलनीय आहे. पहिली ते आठवीच्या अभ्यासक्रमात सहा मुख्य विषय, कला, क्रीडा, कार्यानुभव हे पूरक विषय आहे. तर, नववी-दहावीसाठी दोन सक्तीचे विषय आणि एक वैकल्पिक विषय निवडण्याचे स्वातंत्र्य आहे. त्यामुळे स्काऊट-गाईड हा विषय फारच कमी शाळांमध्ये उपलब्ध आहे. त्यातही सरकाने पाठवलेले डिझाईन आणि मूळ स्काऊट-गाईडचा गणवेश वेगवेगळा आहे. त्यामुळे शिक्षक, पालक, विद्यार्थी संभ्रमात आहेत.

## प्रा.एन.ए. कुलकर्णी यांचा सेवानिवृत्ती बद्दल सत्कार



सुराज्य/सोलापूर

मंद्रुप येथील लोकसेवा विद्या मंदिर-कनिष्ठ महाविद्यालयातील इंग्रजी व मराठी विषयाचे प्रा.नारायण(एन.ए.) कुलकर्णी यांचा सेवानिवृत्तीनिमित्त कुलकर्णी परिवाराच्या वतीने सत्कार करण्यात आला.

रविवारी सोलापुरात हा कार्यक्रम पार पडला.संस्थेचे प्राचार्य श्रीधर टेळे,वांगी प्रशालेचे प्राचार्य गिरीष कुलकर्णी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते तर संस्थेचे सचिव गुरूसिद्ध म्हेत्रे हे अध्यक्षस्थानी होते. म्हेत्रे यांच्या हस्ते शाल-श्रीफल व पुष्पगुच्छ देवून कुलकर्णी व सौ.नेत्रा कुलकर्णी यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. कुलकर्णी यांनी जे विद्यार्थी घडवले, ते आज सर्वत्र मोठ्या पदांवर काम करत आहेत.त्यांनी संस्थेत आदर्श विद्यार्थी घडवण्याचे कार्य केले आहे. अध्यापनाचे कार्य करताना त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये शिस्तही लावली,असे प्रतिपादन म्हेत्रे यांनी याप्रसंगी बोलताना केले.

याप्रसंगी शिक्षक संघटनेचे नेते शिवानंद भरले, गुंजेगावचे किशोर कुलकर्णी,बसवंत दहिवडे, श्री.कुमठेकर, श्रीमंत लायणे, लक्ष्मण कुंभार चंद्रकांत स्वामी, मल्लिकार्जून हत्ताळे,पंढरपूरचे श्रीकांत उत्पात,आशुतोष उत्पात, मधुसूदन कुलकर्णी, प्रकाश कुलकर्णी-निंबर्गीकर, बेगमपूरचे नागेश कुलकर्णी ओंकार कुलकर्णी, ऋषिकेश कुलकर्णी, जेऊरचे रमेश कुलकर्णी,संस्थेचे कर्मचारी आदी उपस्थित होते. नम्रता कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले.लोकसेवाचे अमोल गोंडाळ यांनी आभार मानले.



## चोरट्याने घरासमोरून दुचाकी पळवली

**सोलापूर** : राहत्या घरासमोर पार्क केलेली दुचाकी क्रमांक एमएच.१३.सीएक्स.५६७५ ही चोरून नेली आहे. ही घटना ६ ते ७ जून दरम्यान सिध्दिविनायक नगर सैफुल येथे घडली.याप्रकरणी प्रमोद सिद्रामप्पा गंगनळी (वय-४०,रा.सिध्दिविनायक नगर) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

## महाळुंग येथे रिपाइंचा रस्ता रोको

सुराज्य/श्रीपूर

महाळुंग चौक (ता. माळशिरस) येथे महाराष्ट्रामधील दलित समाजावरील वाढते अत्याचाराचा निषेधार्थ रिपाइं आठवले प्रदेशाध्यक्ष राजाभाऊ सरवदे यांच्या मार्गदर्शनाखाली महाळुंग चौक येथे रिपाइं आठवले शाखा महाळुंग यांच्यावतीने रिपाइंच्या कार्यकर्त्यांनी रस्ता रोको केला.

नांदेड जिल्ह्यातील बोंडार हावेली गावातील अक्षय भालेराव या तरुणाची झालेली हत्या, त्याचबरोबर मुंबई येथे उच्च शिक्षण घेण्यासाठी आलेल्या मागासवर्गीय तरुणीचा झालेला खून त्याचबरोबर लातूर जिल्ह्यातील रेणापूर येथे मातंग समाजातील गिरीरत्न तबकाले यांची हत्या या सर्व घटनांचा निषेध करण्यात आला.

यावेळी मारेकऱ्यांना कठोरात कठोर फाशीची शिक्षा झाली पाहिजे अशी मागणी करण्यात आली. अक्षय भालेराव च्या कुटुंबातील सदस्याला नोकरीमध्ये समाविष्ट करून घ्यावे, तपास सीआयडी कडे देण्यात यावा ,आरोपींची सर्व मालमत्ता जप्त करण्यात यावी, मारेकऱ्यांबरोबर या कटातील मास्टर माइंड पर्यंत पोचण्याकरता आरोपी आणि सहकार्य करणाऱ्या नेत्यांचे सीडीआर तपासण्यात यावेत, अक्षय भालेराव च्या कुटुंबाला शासकीय मदत जाहीर करावी.त्याच बरोबर मुंबई येथे शिक्षण घेण्यासाठी आलेल्या मागासवर्ग तरुणीचा अत्याचार करून खून करण्यात आला या आरोपींना फाशीची शिक्षा व्हावी आदी. मागण्यांचे निवेदन रिपाइं आठवले यांच्या वतीने अकलूज सपोनी सुरवसे, पोलीस कर्मचारी बाळासाहेब पानसरे, किशोर गायकवाड यांना देण्यात आले. याप्रसंगी मिलिंद सरतापे, ज्ञानेश्वर भोसले यांनी मनोगत व्यक्त केले.

रस्ता रोकोला रिपाइं माळशिरस तालुका अध्यक्ष मिलिंद सरतापे,जिल्ह्याचे नेते तुकाराम बाबर, भारत आठवले,अशोकराव चव्हाण,तालुका उपाध्यक्ष संजय भोसले,ता उपाध्यक्ष बापूसाहेब पोळके, युवक जिल्हा उपाध्यक्ष संतोष चंदनशिवे, युवक ता. सरचिटणीस प्रवीण साळवे,युवा तालुका उपाध्यक्ष बाबुराव भोसले, तालुका नेते ज्ञानेश्वर भोसले,वेळापुर युवक अध्यक्ष स्वप्नील सरवदे, वैभव पवार, नागनाथ भोसले, अनिल आठवले, महादेव सावंत, मसू चव्हाण यासह रिपाइं आठवले गटाचे कार्यकर्ते व महिला वर्ग मोठ्या संख्येने रस्ता रोको मध्ये सहभागी झाले होते.

## मार्डी येथे सामूहिक उपनयन सोहळा

सुराज्य/उ. सोलापूर



उत्तर तालुक्यातील मार्डी येथे यमाई देवस्थानच्या सभा मंडपात सामूहिक उपनयन सोहळा पार पडला. ११ बटूंचा देवस्थान ट्रस्टी, पुजारी रंगनाथ गंगाधर गुरव यांनी त्याचे तीन सुपुत्रसह समाजातील आठ बंटूचा स्व - खर्चाने शाही पध्दतीने पध्दतीने होम हवन, विधी बटूंची मिरवणूक काढण्यात आली.

पुरोहित दत्ता मोकाशी, योगेश शास्त्री, पोरे गाणगापूरचे मटाधिपती यशवंत गिरीजी महाराज,किन्नर आखाड्याचा महामंडळेश्वर श्री श्री श्री १००८ गीता ताई नंदगी यांनी विधिवत धार्मिक विधीनंतर उपनयन सोहळा संपन्न झाला.बंटूना शुभा आशीर्वाद देन्यासाठी भाजप जिल्हा कार्यकारणी सदस्य शहाजी पवार,पंचायत समिती उत्तरचे माजी सभापती संध्याराणी इंद्रजित पवार,इंद्रजित पवार,भाजप उत्तर तालुका अध्यक्ष काशिनाथ कदम, शिवसेना उत्तर तालुका प्रमुख सुधीर गोरे, बाळासाहेब देशमुख, उपसरपंच कांतीलाल मार्तंडे, सुवर्णाताई झाडे,गणेश पवार, विठ्ठल काशीद, एड इंद्रजीत पाटील, सुभाष डांगे, किशोर पाटील, नगरसेविका कल्पना कारभारी, गणेश पुजारी, मल्लिकार्जुन गुरव, बलभीम पाथरकर, शहाजी चराटे, दत्तात्रेय गुंडू गुरव, प्रदीप महासागर, सचिन गुरव, चंद्रकांत गुरव, सचिन गुरव, समाधान बेंद्रे, दयानंद जवळगावकर यांच्यासह गुरव समाज बांधव उपस्थित होते.

# दक्षिणच्या विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही

## आमदार सुभाष देशमुख यांची ग्वाही; इंगळगी ते होटगी रस्त्याचे भूमिपूजन

सुराज्य/दक्षिण सोलापूर

दक्षिण विधानसभा मतदारसंघात ६० वर्षांच्या तुलनेने मागील आठ वर्षात मोठ्या प्रमाणात विकास कामे झाली आहेत. प्रामुख्याने रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छतेची कामे झाली आहेत व होत आहेत. या पुढील काळातदेखील सोलापूर दक्षिणच्या विकासासाठी निधी कमी पडू देणार नसल्याची ग्वाही आमदार सुभाषबापू देशमुख यांनी दिली.

दक्षिण सोलापूर तालुक्यातील इंगळगी ते होटगी रस्ता भूमिपूजनाच्या शुभारंभ प्रसंगी आमदार सुभाषबापू देशमुख हे बोलत होते. यावेळी भाजपचे तालुकाध्यक्ष रामप्पा चिवडशेट्टी, बाजार समितीचे संचालक आप्पासाहेब पाटील, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता महाजन, भाजपचे सरचिटणीस यतीन शहा, आप्पासाहेब मोटे, इंगळगी सोसायटीचे चेअरमन शिलिशिद्ध कोटे, उद्योजक शिवानंद हत्तुरे, ग्रामपंचायत सदस्य सिध्देश्वर घोडके, विद्याधर वळसंगे, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष बसवराज गाडेकर, माणिकराव देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत राहुल वंजारे यांनी केले.



देशमुख म्हणाले की, पूर्वी तालुक्यात रस्ते अतिशय खराब होते. यामुळे नागरिकांना खडतर वाटेतून प्रवास करावे लागत असे. आता मात्र केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांमुळे रस्ते अतिशय चांगले झाल्याचे आपण पाहतो. सर्वच गावात पाण्याची देखील चांगली सोय चालू आहे. गावच्या विकासासाठी व समृध्दीसाठी निधी कमी पडू देणार नाही, यासाठी आपले पाठपुरावा महत्वाचे असल्याचे आमदार देशमुख यांनी सांगितले.

यावेळी भाजप बूथ प्रमुख सागर धुळवे, राजशेखर बंडगर, विनोद बनसोडे, प्रधान गुरव, सचिन वळसंगे भीमाशंकर कोळी, रफिक शेख, धनराज वळसंगे, गोरख माळी, रेवणा स्वामी, अमर माने, राम माने, भगवान राऊत, जितेंद्र गायकवाड, प्रदीप घोडके, गुलाब शेख आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भीमाशंकर बंदीछोडे यांनी केले.

सुराज्य Classified
नोकरी विषयक
Ex. Service Man at
**Valsang Toll Plaza**
(Neeraj kumar)
interested Candidate
Contact at Toll Plaza.
Mob No. : 9028919046
(120623)

## महत्त्वाचे वृत्त



### आळंदीत वारकऱ्यांवर लाठीमार?

**आळंदी** : पालखी सोहळ्याला काही प्रमाणात गालबोट लागलं आहे. पालखी सोहळ्यादरम्यान वारकरी आणि पोलिसांमध्ये वाद झाला आहे. मंदिरातील प्रवेशावरुन हा वाद झाला आहे. संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी सोहळ्या दरम्यान तणावाचं वातावरण निर्माण झालं होतं. पोलिसांकडून काही प्रमाणात वारकऱ्यांवर लाठीमार करण्यात आला त्यानंतर हा वाद मिटला. मात्र या वादानंतर पोलिसांकडून स्पष्टीकरण देण्यात आलं आहे. पोलिसांकडून कोणत्याही प्रकारचा लाठीमार झाला नसून झटापट झाल्याचं पिंपरी-चिंचवडचे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी सांगितलं आहे. पिंपरी-चिंचवडचे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी सांगितलं की, पालखी प्रस्थान सोहळा हा दरवर्षी आयोजित होतो. आजही मानाच्या ५६ पालख्या आल्या होत्या. गेल्यावर्षी चेंगराचेंगरीची स्थिती निर्माण झाली होती आणि त्यावेळी काही महिलासुद्धा जखमी झाल्या होत्या. त्यामुळे यावर्षी प्रधान जिल्हा न्यायाधीश, धर्मादाय आयुक्त, मंदिर प्रमुख विश्वस्त यांच्यासोबत ३ वेळा बैठका घेऊन गेल्यावर्षीसारखी परिस्थिती निर्माण होऊ नये, म्हणून प्रत्येक मानाच्या पालखींतील प्रत्येकी %५ जणांना प्रवेश देण्याचा निर्णय पूर्वीच घेण्यात आला आणि तसे नियोजनसुद्धा करण्यात आले.



### तणाव झाला, त्याच चौकात भाईचारा

**कोल्हापूर** : 'सर्वधर्म समभाव' जपणाऱ्या पुरोगामी कोल्हापुरात शाहूराजांच्या विचारांवर चालणारे कित्येक लोक आहेत. त्यातीलच दोघे-दिलीप चौगुले आणि गणी तांबोळी.... दोघेही वेगवेगळ्या धर्मातील असले तरी त्यांची दोस्ती त्यांच्या धर्माहून अधिक घट्ट आहे. गेल्या २३ वर्षांपासून ते कोल्हापुरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात एकत्र पानाचं दुकान चालवतात. त्यांचा धर्म त्यांच्या दोस्ती वा व्यवसायाच्या आड कधीच आला नाही. ज्या कोल्हापुरात चार दिवसांपूर्वी धार्मिक हिंसाचार झाला, दगडफेक झाली, त्याचं रुपांतर दंगलीत झालं, त्याच कोल्हापुरात हिंदू-मुस्लीम धर्मातील दोस्त पानाचं दुकान चालवतात, ही गोष्ट नक्कीच दंगलीच्या वणव्यात दोस्तीचा गारवा असल्यासारखी आहे.

### पालघर जिल्ह्यात वादळाचा तडाखा

**पालघर** : पालघर जिल्ह्याला वादळाचा जोरदार तडाखा बसला आहे, यात विविध गावांमध्ये जबर नुकसान झाले आहे. वाडा तालुक्यातील एका घराचे छत कोसळले असून यामध्ये एक महिला जखमी झाली. ठिकठिकाणी विजेचे खांब वाकून तारा तुटल्याने अनेक ठिकाणचा विद्युत प्रवाह खंडित झाला होता. सोसाट्याच्या वाऱ्यासह आलेल्या वादळामुळे अनेक ठिकाणी झाडे सुद्धा उन्मळून पडली आहेत. दुपारच्या वेळेस आलेल्या जोरदार धूळ मिश्रित वाऱ्याने नागरिकांची भांबेरी उडवली होती. वादळाच्या तडाख्यात सापडून वाडा तालुक्यातील शेले दाढरे येथे एका घराचं मोठं नुकसान झालं आहे. अचानक आलेल्या वादळाच्या तडाख्याने घराचं छप्पर उडून गेलं असून यात शेवंती भीमा शनवारे या आजी जखमी झाल्या आहेत.

### देहूत १४ टन ओला कचरा

**देहू** : संत तुकाराम महाराजांच्या पालखीचं प्रस्थान काल देहूतून झालं. या पालखी सोहळ्यादरम्यान झालेल्या कचऱ्याची स्वच्छता त्वरीत करण्यात आली आहे. गावात स्वच्छता राहावी आणि कोणालाही यापासून दुर्गंधी किंवा त्रास होऊ नये, यासाठी लगेच स्वच्छता करण्यात आली. १४ टन ओला कचरा आणि इतर कचरा, तसेच ६५० किलो प्लास्टिक कचरा जमा करण्यात आला. देहू परिसराची झाडलोट आणि स्वच्छता करून कचरा संकलित करण्यात आला आणि कचऱ्याचे उचित व्यवस्थापन करण्यात आले. अन्नपदार्थ, पत्रावळी अशा स्वरुपाचा १४ टन ओला कचरा व इतर कचरा, तसेच ६५० किलो प्लास्टिक कचरा संकलित करण्यात आला आहे. जगद्गुरू संत तुकाराम पालखी सोहळा पंढरीकडे मार्गस्थ झाल्यानंतर देहू नगरीतील रस्त्यांची त्वरीत स्वच्छता करण्यात आली.

### महाराष्ट्राला आज व उद्या येलो अलर्ट

**नागपूर** : राज्यात मान्सूनच्या आगमनाची वर्दी देत असतानाच भारतीय हवामान खात्याने येलो अलर्ट' दिला आहे. ११ व १२ जूनला महाराष्ट्रातील काही भागात वादळी वाऱ्यासह व विजांच्या कडकडाटांसह पाऊस पडण्याची अधिक शक्यता असल्याचे, हवामान खात्याने कळवले आहे. संपूर्ण गुजरात, सौराष्ट्र आणि कच्छ या भागाला बिपरजॉयचा तडाखा बसणार असणार असल्याने या भागात १५ जूनपर्यंत तर, गोवा, महाराष्ट्रातील कोकण, मराठवाडा, मध्य महाराष्ट्राला पुढचे ११ जून आणि १२ जून या दोन दिवस वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. तर संपूर्ण विदर्भात १५ जूनपर्यंत विजांच्या कडकडाटांसह मान्सूनपूर्व वादळी पावसाची अधिक शक्यता आहे, असे देखील हवामान विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

### डब्ल्यूटीसी फायनलमध्ये भारताचा पराभव करत ऑस्ट्रेलियाने रचला इतिहास


**लंडन** : वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपचा अंतिम सामना जिंकून ऑस्ट्रेलियाने इतिहास रचला आहे. इंग्लंडमधील ओव्हल येथे टीम इंडियाचा २०९ धावांनी पराभव करून, ऑस्ट्रेलिया सर्व फॉरमॅटमध्ये आयसीसी ट्रॉफी जिंकणारा पहिला संघ बनला आहे. ऑस्ट्रेलियाने रविवारी ही ऐतिहासिक कामगिरी केली. आयसीसीच्या नऊ ट्रॉफी जिंकून ऑस्ट्रेलिया जगातील सर्वात यशस्वी संघ बनला आहे. ऑस्ट्रेलियाने १९८७ चा एकदिवसीय विश्वचषक जिंकून याची सुरुवात केली होती. त्यानंतर १९९९ आणि २००३ एकदिवसीय विश्वचषक जिंकून त्यानी बॅक टू बॅक विजेतेपद मिळवले. यावेळी ऑस्ट्रेलिया अजेय बनला होता. त्यानंतर २००६ चॅम्पियन्स ट्रॉफी, २००७ एकदिवसीय विश्वचषक, २००९ चॅम्पियन्स ट्रॉफी, २०१५ एकदिवसीय विश्वचषक आणि टी-२० विश्वचषक २०२१ जिंकून ते इतिहास रचण्यापासून फक्त एक पाऊल दूर होते.

# ३० लाख दस्तांची होणार फेरतपासणी

## महसूलमंत्र्यांचा आदेश, कोणत्या शहरांतील दस्त तपासणार?

सुराज्य/पुणे

**तुकडेबंदी, 'महारेरा'च्या नियमांचे उल्लंघन झाल्याच्या तक्रारीवरून आता राज्यातील २०२० ते २२ या तीन वर्षांतील पुण्यासह मुंबई, ठाणे, नागपूर, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, परभणी, लातूर येथील सुमारे ३० लाख दस्तांच्या फेरतपासणीचे आदेश महसूलमंत्र्यांनी दिले आहेत. त्यामुळे राज्यातील नोंदणी मुद्रांक विभाग कामाला लागला आहे. यासाठी पथकांची नियुक्ती करण्यात आली असून, खरेदी खत, बक्षीसपत्रे यासारख्या जमीन हस्तांतरणाच्या दस्तांचीही फेरतपासणी केली जाणार आहे. त्यानंतर किती दस्त बेकायदा आहेत हे स्पष्ट होणार आहे. त्यामुळे अनेकांचे धाबे दणाणले आहेत.**



महाराष्ट्र धारण जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करणे आणि त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबतच्या कायद्यातील तरतुदींनुसार प्रत्येक जिल्ह्यासाठी प्रमाणभूत क्षेत्र निश्चित करण्यात आले आहे.

कायद्याच्या कलम नऊमध्ये केलेल्या सुधारणेनुसार, २०१७ पर्यंत तुकड्यांचे झालेले हस्तांतरण शुल्क जमा करून कायदेशीर करण्यात आले आहेत. तरीही अद्याप शेतजमिनींचे तुकडे पाडून प्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्राच्या हस्तांतरणाचे व्यवहार नोंदविण्यात येत असल्याचे गैरप्रकार आढळले आहेत. या प्रकाराच्या तक्रारी महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे करण्यात आल्या होत्या. त्या तक्रारींची दखल घेऊन महसूलमंत्र्यांनी तुकडेबंदी; तसेच 'महारेरा'च्या कायद्यांचे उल्लंघन करणाऱ्या दस्तांची फेरतपासणी करण्याचे आदेश नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रकांना दिले होते. त्यानुसार राज्यातील सर्व नोंदणी उपमहानिरीक्षकांना फेरतपासणीचे आदेश देण्यात आले आहेत.

**गेल्या तीन वर्षांतील दस्तांची तपासणी**

महाराष्ट्र नोंदणी अधिनियम कलम ४४ आय या कलमांचे; तसेच जमीन अकृषक (एनए) असल्याचे आदेश दाखल न करणे, एक ते दोन गुंठ्यांच्या जमिनींचे खरेदी खत करता येत नसतानाही तुकडेबंदी, महारेरा' कायद्यांचे उल्लंघन केलेल्या दस्तांची फेरतपासणी करण्यात येणार आहे. अशा प्रकारच्या २०२० ते २२ या तीन वर्षांतील दस्तांची फेरतपासणी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या तपासण्या आता नोंदणी उपमहानिरीक्षकांसह सह जिल्हा निबंधकांच्या पातळीवर स्वतंत्रपणे करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

तीन वर्षांत जमीन हस्तांतरण झालेले; तसेच खरेदीखत, बक्षीसपत्रे यांसारखी प्रकरणे तपासली जाणार आहेत.

**कोणत्या शहरांतील दस्त तपासणार?**


पुणे शहरातील सह जिल्हानिबंधक कार्यालय; तसेच ठाणे येथील कार्यालयांमधील दस्त तपासण्यात येणार आहेत. मुंबईतील दुय्यम निबंधक मुंबई शहर क्रमांक एक ते पाच, दुय्यम निबंधक अंधेरी क्रमांक दोन, अमरावतीतील दुय्यम निबंधक अमरावती क्रमांक एक ते तीन, अकोल्यातील दुय्यम निबंधक क्रमांक एक ते तीन या कार्यालयांतील दस्त तपासले जाणार आहेत. त्याशिवाय नागपुरातील दुय्यम निबंधक कार्यालय क्रमांक एक ते आठ, नाशिकमध्ये एक ते सात, लातूर विभागातील छत्रपती संभाजीनगर दुय्यम निबंधक क्रमांक एक ते पाच कार्यालयांतीलही दस्त तपासले जाणार आहेत.

छत्रपती संभाजीनगर विभागातील नांदेड, परभणी, धाराशिव येथील दस्तांची फेरतपासणी होणार आहे. राज्यभरात वर्षाला सुमारे २५ ते ३० लाखापर्यंत दस्तांची नोंदणी होत आहे. त्यापैकी उल्लंघन झाल्याच्या तक्रारींनुसार तीन वर्षांतील सुमारे ३० लाख दस्तांची तपासणी करावे लागेल, असे नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागातील सूत्रांचे म्हणणे आहे. स्वतंत्र पथकांची नियुक्ती -

▶ महारेरा, तुकडेबंदी कायद्याचा भंग करणाऱ्या दस्तांची संख्या अधिक असण्याची शक्यता आहे. ▶ महानिरीक्षकांच्या आदेशानुसार प्रत्येक विभागातील कार्यालयांमधील पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे. ▶ नोंदणी उपमहानिरीक्षक; तसेच सहजिल्हा निबंधक कार्यालयांनी स्वतंत्र तपासणी करण्याचा आदेश. ▶ नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागात सध्या मनुष्यबळ अपुरे असल्याने या तपासणीचे मोठे आव्हान आहे.

# महाराष्ट्रावरील चक्रीवादळाचे सावट दूर

सुराज्य/मुंबई



अरबी समुद्रात निर्माण झालेल्या बिपरजॉय चक्रीवादळाचा कोकण किनारपट्टीला असलेला धोका जवळपास टळला आहे. अरबी समुद्रावरील बिपरजॉय चक्रीवादळाचे रुपांतर आता अत्यंत रौद्ररूप धारण केले आहे. याचा सर्वाधिक धोका हा गुजरातच्या किनारपट्टीला निर्माण झाला आहे. अरबी समुद्रातील बिपरजॉय चक्रीवादळ हे उत्तर पूर्वेकडे पुढे सरकत आहे. या चक्रीवादळाचे रुपांतर आता तीव्र चक्रीवादळात झाले आहे. हे चक्रीवादळ गुजरातच्या किनारपट्टीला धडकणार आहे. यामुळे सौराष्ट्र-कच्छच्या किनारपट्टीला चक्रीवादळाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. हे चक्रीवादळ रविवारी पहाटे ५.३० वा. मुंबईपासून ५८० किलोमीटर अंतरावर होते तर गुजरातच्या पोरबंदरपासून ४८० किलोमीटर, द्वारकापासून ५३० किमी, नलियापासून ६१० किमी आणि कराचीपासून ७८० किलोमीटर अंतरावर होते. बिपरजॉय चक्रीवादळाचा धोका पाकिस्तानच्या किनारपट्टीलाही आहे. हे चक्रीवादळ १५ जूनला पाकिस्तानच्या मांडवी (गुजरात) - कराची (पाकिस्तान) दरम्यान धडकेल आणि किनारपट्टी ओलांडून पुढे जाईल. यावेळी वाऱ्यांचा वेग हा १२५ ते १३५ किंवा त्याहूनही अधिक १५० प्रति तास किलोमीटर असण्याची शक्यता आहे, असं हवामान विभागाने म्हटलं आहे.

## धनगर समाजासाठी सरकारची खास योजना

**सुराज्य/मुंबई** : राज्यात लवकरच मेंढीपालन वाटपाची योजना सुरू केली जाणार असल्याची माहिती मंत्रालयातील सूत्रांनी दिली. तेलंगण सरकारच्या धर्तीवर ही योजना राबविण्यात येणार असल्याचे सांगितले जात असून यासाठी १० हजार कोटी रुपयांचा निधींची तरतूद केली जाणार असल्याचे समजते. राज्यात केवळ २५ टक्के अनुदान व ५० टक्के कर्ज देऊन ही योजना राबविली जाण्याची शक्यता आहे.

राज्यातील पशु व दुग्ध विकास विभागातील अधिकाऱ्यांचे विशेष पथकाने नुकतीच तेलंगणला भेट दिली होती. या भेटीत त्यांनी या



मेंढीवाटपाच्या योजनेची सविस्तर माहिती घेतली होती. त्यानंतर राज्यात धनगर समाजासाठी ही योजना राबविण्याचे विभागाने निश्चित केले आहे. ही योजना राबविताना राष्ट्रीय सहकार विकास महामंडळाकडून १० हजार कोटींचे कर्ज घेणार असल्याचे बोलले जात आहे. आगामी निवडणुकीसाठी धनगर समाजाला डोळ्यासमोर ठेवून ही योजना आखण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे. राज्यात सुमारे ४ लाख लोकसंख्या असलेल्या यादव/गोल्ला/कुरुमा कुटुंबांच्या उन्नतीसाठी ही योजना आखण्यात येणार आहे.

# आरोग्य विभागाच्या 'या' मोहिमेला यश

सुराज्य/मुंबई

राज्यातील महिलावर्गाचे आरोग्य सुरक्षित करण्यासाठी राज्य सरकारने सुरू केलल्या 'माता सुरक्षित तर घर सुरक्षित' या मोहिमेच्या पहिल्या टप्प्याला चांगला प्रतिसाद मिळाला आहे. पहिल्या टप्प्यात जवळपास ४ कोटी ३९ लाख २४ हजार १०० महिलांनी या योजनेचा लाभ घेतला असल्याची माहिती आरोग्य विभागाने दिली आहे. तपासणी केलेल्या ३० वर्षांवरील एकूण ४ लाख १९ हजार ५८४ महिलांना उच्च रक्तदाब आणि २ लाख ५७ हजार १९८ महिलांना मधुमेहाची लक्षणे आढळून आली आहेत.

राज्य सरकारच्या आरोग्य विभागातर्फे गेल्या वर्षी नवरात्रीपासून ही मोहीम सुरू करण्यात आली. या मोहिमेंतर्गत राज्यातील १८ वर्षावरील महिलांना, गरोदर स्त्रियांना प्रतिबंधात्मक आणि उपचारात्मक आरोग्य सुविधा आणि सुरक्षित व सुदृढ आरोग्यासाठी समुपदेशन सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. त्यानुसार या उपक्रमाचा पहिला टप्पा नुकताच पूर्ण करण्यात आला.



**५२ हजार महिलांवर शस्त्रक्रिया, ४ कोटी लाभार्थी**

या मोहिमेच्या दुसऱ्या टप्प्यात पहिल्या टप्प्यातील तपासणी केलेल्यापैकी एकही लाभार्थी औषधोपचारापासून तसेच शस्त्रक्रियेपासून वंचित राहू नये, असे आदेश आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांनी दिले असून यासाठी कालबद्ध कार्यक्रम अंमलात आणण्याची सूचना केली आहे.

या अभियानाच्या पहिल्या टप्प्यातील आकडेवारींनुसार एकूण ४ कोटी ३९ लाख २४ हजार १०० लाभार्थ्यांची नोंद करण्यात आली आहे. त्यात एकूण २७ लाख ९७ हजार ३९४ गरोदर मातांची तपासणी करण्यात आली आहे. त्यापैकी १ लाख १८ हजार १६९ मातांना उच्च रक्तदाबाची प्राथमिक लक्षणे आढळून आली आहेत. तर रक्तक्षय असलेल्या १ लाख १३ हजार २२९ मातांना आयर्न सुक्रोज देण्यात आल्याची माहिती आरोग्य विभागाने दिली आहे.

## शिवसेनेच्या पाच मंत्र्यांना भाजपा हटवणार

**एकनाथ खडसेंचा गौप्यस्फोट**

सुराज्य/जळगाव

बंडखोरी करून भाजपासोबत युतीचे सरकार बनवलेल्या शिवसेनेतील पाच मंत्र्यांना हटवणार असल्याचा गौप्यस्फोट ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी काही दिवसांपूर्वी केल्यानंतर आता राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे यांनी भाजपाच्या हायकमांडने शिवसेनेच्या पाच मंत्र्यांना हटवण्याची भूमिका घेतली असून त्यात मंत्री गुलाबराव पाटील यांचाही समावेश असल्याचा गौप्यस्फोट केला आहे.

गेल्या काही दिवसांपासून राज्यात शिंदे-फडणवीस सरकारच्या मंत्रिमंडळ विस्ताराच्या चर्चांना जोरदार उधाण आले आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आठवड्याभरापूर्वी गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली होती. त्यामुळे लवकरच मंत्रिमंडळ विस्तार होण्याची शक्यता वर्तविली जात असताना एकनाथ खडसे यांनी शिवसेनेच्या पाच मंत्र्यांना भाजप हटवणार असल्याचा गौप्यस्फोट केला आहे. ते म्हणाले की, 'ठाकरे गटातील नेते, खासदार संजय राऊत यांनी नुकताच केला आहे.



## १६ एसटी कर्मचाऱ्यांची बढती रद्द होणार

सुराज्य/नागपूर

एकीकडे एसटी महामंडळात बढती होत नसल्याची ओरड कर्मचारी करतात तर दुसरीकडे बढती मिळालेले १६ जण अद्यापही निश्चित ठिकाणी रूजू झाले नाहीत. हे कर्मचारी १२ जूनपूर्वी निश्चित ठिकाणी रूजू न झाल्यास त्यांची बढती रद्द होणार आहे.


एसटी कर्मचाऱ्यांनी शासनात विलिनिकरणाच्या मागणीसाठी काही महिन्यांपूर्वी संप केला होता. त्यावेळी बढती प्रक्रियेबाबतही तक्रार करण्यात आली होती. त्यानंतर आता वरिष्ठ लिपिकांची लेखाकार पदावर, तर सहाय्यक भांडारपालांची भांडारपालपदी बढती करण्यात आली. बहुतांश कर्मचाऱ्यांना विभागाबाहेर पदस्थापना दिली गेली. परंतु, या कर्मचाऱ्यांपैकी सुमारे १६ कर्मचारी अद्यापही बढतीच्या ठिकाणी रूजू झालेले नाहीत. या कर्मचाऱ्यांकडून बढती नाकारण्याबाबतही काही कळवण्यात आलेले नाही. दरम्यान, महामंडळाने १२ जून २०२३ पर्यंत बढतीच्या ठिकाणी कर्मचारी हजर न झाल्यास त्यांचा बढतीस नकार समजून त्यांची बढती रद्द करण्याचे आदेश राज्यातील सगळ्या विभाग नियंत्रक, कार्यशाळा व्यवस्थापक आणि संबंधित विभाग प्रमुखांना दिले आहेत.

# संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली पालखीचे पंढरपूरकडे प्रस्थान

सुराज्य/आळंदी

आषाढी वारीसाठी संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीने पंढरपूरकडे प्रस्थान ठेवले आहे. शनिवारी देहूतुन जगद्गुरू संत तुकाराम महाराज पालखीचे पंढरपूरच्या दिशेने मार्गस्थ झाली आहे. टाळ-मृदंग आणि ग्यानबा तुकारामाच्या जयघोषात वारकरी दंग झाले होते. इंद्रायणी काठावर वैष्णवांची मांदियाळी बघायला मिळाली. मोठ्या भक्ती भावात आणि उत्साहात ज्ञानोबा माऊलींच्या पालखीने पंढरपूरकडे प्रस्थान ठेवले आहे.

पहाटेपासूनच संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीचा प्रस्थान सोहळा सुरू झाला. विधिवत महापूजा झाल्यानंतर पालखीने पंढरपूरकडे प्रस्थान ठेवले. मुख्य मंदिर आकर्षक फुलांनी सजवण्यात आलं होतं. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून लाखोंच्या संख्येने वारकरी आळंदीत दाखल झाले होते. पवित्र इंद्रायणी नदीत स्नान करून वारकरी माऊलींच्या प्रस्थान सोहळ्यात सहभागी झाले. ग्यानबा तुकारामाच्या गजराने अवघी आळंदी दुमदुमून गेली होती. प्रस्थानावेळी मुख्य ४७ दिंड्यामधील वारकरी, टाळकरी, ग्यानबा तुकारामाच्या तालावर ठेका धरला होता. टाळ मृदंगाच्या गजरात माऊलींच्या पालखीचे प्रस्थान पंढरपूरकडे झाले. माऊलींची पालखी श्री क्षेत्र आळंदीमधील गांधीवाडा येथील आजोळघरी मुक्कामी असेल. नयनरम्य आणि भव्य सोहळा अनुभवण्यासाठी वारकऱ्यांप्रमाणेच नागरिकांचीही गर्दी बघायला मिळाली.



पावनं ऽऽ रामराम



काय म्हणतयं? पॉलिटिक्स

# घुसमट... म्हणजे काय रे भाऊ?

**अलिकडील राजकारणात ज्यांना ज्वारीच्या भाकरीचा चवही माहिती नाही, अशांमध्ये 'भाकरी' हा शब्द जसा रुढ झाला आहे, तसा 'घुसमट' हा एक शब्द रुढ होत चालला आहे. राजकारणात आल्यानंतर स्वत:च्या वैयक्तिक चातुर्याचा एक-दोन टक्के भाग वगळता बाकी पक्षाच्या जीवावर मोठे होऊन पक्षातील आणि सत्ताकारणातील विविध पदे भूषवूनही अनेक महाभाग म्हणतात, आपल्यावर 'अन्याय' झाला..., हा अन्याय किती दिवस सहन करायचा..., सहनशिलता काही आहे की नाही..., आपली पक्षात 'घुसमट' होत आहे...' वगैर वगैरे...! अगदी असेच 'लोणचे' गल्लीपासून, राज्य ते दिल्ली पातळीपर्यंत तयार होत आहे. आता याला पक्ष तरी काय करणार आणि पक्षातील वरिष्ठ नेते तरी काय करणार?.**






शंकर जाधव, कार्यकारी संपादक
मो. ९५१८७७३०४८

यात आता सोलापूरचाच पाढा घेऊ या. प्रा. अशोक निंबर्गी भाजपाच्या तालमीत पक्के तयार झालेले. जबरदस्त वक्तृत्वशैली असलेले 'सर' पक्षात सक्रिय होत गेले. त्याचेच फळ म्हणून त्यांना प्रथम मनपा शिक्षण मंडळाचे सदस्यपद मिळाले. नंतर स्वीकृत नगरसेवकपद, कृषी उत्पन्न बाजार समितीचे स्वीकृती संचालकपद मिळाले. एवढेच नाहीतर शहर भाजपात सर्वोच्च असलेले शहराध्यक्षपदही मिळाले. याशिवाय त्यांच्या पत्नीला देखील नगरसेवकपदाची संधी देण्यात आली. आता एवढे सगळे मिळाल्यावर आणखी काय हवे. पण राजकारणात उतरल्यावर सत्तेची आणि पदाची अभिलाषा येते. ती सर्वांनाच असली पाहिजे. पण त्याला वेळ आणि काळ असतो. पण ही वेळ आणि काळ न पाहता एखाद्याला दुषणे देऊन पूर्ण पक्षाला दावणीला बांधण्याचा आणि पक्षावर गरळ ओकण्याचा जो प्रकार होतोयं, तो मात्र अनाकलनीय आहे.

प्रा. निंबर्गी सर यांच्या मते आ. विजयकुमार देशमुख यांनी माझ्यावर अन्याय केला. त्यांच्यामुळे माझी पक्षात घुसमट होत आहे.दीड-दोन वर्षांपूर्वी मी शहराध्यक्षपासून दूर झालो. तेव्हापासून पक्षात घुसमट होतेय. माझे पाय ओढले जात आहेत. या सर्व हुकुमशाहीला कंटाळून मी भाजपाला सोडचिठ्ठी देतोय. खरंतर यातून सरांना मार्ग काढता आला असता. पक्षातील वरिष्ठ नेते त्यांच्या मर्जीतील होते. पण असा कुठलाही मार्ग न अवलंबिता त्यांनी काँग्रेसचा 'हात' हातात घेतला. तेथे त्यांना मिळून मिळून काय मिळाले, शहराचे प्रवक्तेपद. खरंतर काँग्रेसमध्ये अनेक निष्ठावान कार्यकर्ते आजही पदासाठी पक्षात लाईन लावून उभे आहेत. तेथे प्रवक्तेपदाच्या तुकड्यावर सर काय करणार?. खरंतर त्यांच्या व्यक्तिमत्वाला न शोभणारे हे पद आहे. नजिकच्या काळात याची प्रचिती त्यांना येईलच. पण त्यांची पक्षात 'घुसमट' झाली ती कुणामुळे आणि कशासाठी?. म्हणूनच सरांना विचारायचे आहे की 'घुसमट, म्हणजे काय हो सर?.

आता हे आहेत आपले सुरेशअण्णा..., भाजपाचे कट्टर कार्यकर्ते आणि 'कचराफेम' कार्यकर्ते म्हणून नावारुपास आले. पुढे १९९७ ला स्व. लिंगराज वल्याळ यांच्या कृपेने नगरसेवक झाले. ते आजतागायत कायम आहेत. पक्षाने त्यांना स्थायी समितीचे सभापतीपद दिले. दोनवेळा विरोधी पक्षनेतेपदाची संधी दिली. नंतर २०१७ ला सत्ताधारी भाजपाचे सभागृहनेतेपद दिले. पक्षाने पालिकेतील त्यांच्या वाट्याला जसे आले तसे दिले. आता त्यांना महापौर आणि आमदार व्हायचे. पोराला राजकारणात पुढे आणायचे आहे. त्यांना याबाबतीत शुभेच्छा.

पण ते म्हणतात, पक्षात माझी 'घुसमट' होत आहे. आता त्यांचा हा रोख नेमका कुणाकडे आहे, भाजपातील साध्या कार्यकर्त्यालाही ठाऊक आहे. एकेकाळी आ. विजयकुमार देशमुख यांच्या ताटाला ताट लावून जेवणारी या मंडळींचे ताट कशामुळे खणखणले, हे मात्र आजही गुलदस्त्यात आहे. परवा तर समर्थक कार्यकर्त्यांची बैठक घेऊन कुणाचे नाव न घेता त्यांनी आगपाखड केली. त्यांच्या गळाला काँग्रेसवासी झालेले प्रा. निंबर्गी सर, विजय साळुंखे आणि आणखी चार-पाच कार्यकर्ते चिकटले. त्यांचे काँग्रेसमध्ये येण्याइतपत मन तयार केले. पण दरम्यान भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावणकुळे यांचा त्यांना फोन आला. त्यांनी सुरेशअण्णांना समजावले. नंतर अण्णांनी जनसंघ माझी आई आहे, आणि भाजपा माझा बाप आहे, अशी गर्जना करुन आपण तूर्त भाजपात आहोत. पण नजिकच्या काळात काही झाले तर काय सांगता येत नाही, असा सूचक इशारा देऊन त्यांनी काँग्रेसची वाट मोकळी करुन दिली आहे. आता यात 'घुसमट' आलीच. कोण करतंय तुमची घुसमट. जो कोणी करतोय त्याला धडा शिकवा. अण्णा, तुमच्यात तशी धमक आहे. पण हे काहीही न करता घुसमट..., घुसमट..., असा तुम्ही जप करतायं म्हणूनच अण्णा, घुसमट म्हणजे काय हो?, हा तुम्हाला प्रश्न आहे.

आता तिसरा प्रकार आहे, तो थेट बीडमधला... माजी मंत्री पंकजाताई मुंढे यांचा...!, महाराष्ट्राचे मासलिडर आणि पिताश्री स्व. गोपीनाथ मुंढे यांच्या पंकजाताई डॅशिंग कन्या. दोन वेळा आमदारकी, युती काळात कॅबिनेट मंत्रीपद, पक्षात राष्ट्रीय पातळीवरील चिटणीसपद. दुसऱ्या बहिण प्रितमताई खासदार. घरातीलच कलहामुळे भाऊ धनंजय मुंढे यांच्याकडून पंकजाताई २०१९ ला पराभूत झाल्या. तेव्हापासून मागल्या दाराने आमदारकी मिळविण्यासाठी त्या प्रयत्न करीत आहेत. पण त्यात त्यांना यश मिळत नाही. असे असले तरी विविध उपक्रम घेऊन किंवा वादग्रस्त वक्तव्य करुन त्या नेहमी प्रकाशझोतात असतात. विशेष म्हणजे पंकजाताई तरी भाजपामधील नेत्यांना धक्का देणारे वक्तव्य करतातच शिवाय इतर पक्षातील नेतेही त्यांची बाजू घेऊन बोलतात आणि आमच्या पक्षात या, असे आवताण देतात.

या सर्व प्रकारात आपली 'घुसमट' होतेयं. असा अप्रत्यक्ष शब्द त्यांच्या तोंडी नेहमी असतोच. खरतर सत्तेतील पद नसले म्हणून काय झाले. त्यांना राष्ट्रीय स्तरावरील चांगले पद दिले आहे. त्यांच्या बरोबरीने विनोद तावडेंनाही पक्षात मानाचे पद दिले आहे. त्यांनी अलिकडील काळात पक्षात सक्रिय राहून पदाला न्याय दिला आहे. तसे पंकजाताईंनी केलेले आठवत नाही. आजही त्यांना पक्षात मान आणि सन्मान आहे. त्यांचा सुदपयोग न करता पक्षात 'घुसमट' होतंय, असे सांगत त्या फिरतात. म्हणूनच 'ताई... घुसमट म्हणजे नेमके काय हो?. ही तऱ्हा केवळ भाजपातच आहे, असे नाही. सर्वच पक्षातील नेत्यांना पक्षातील आणि सत्तेतील मानाची पदे देऊन अनेकजण म्हणतात, 'माझी पक्षात घुसमट होतेयं', म्हणूच सर्वसामान्य कार्यकर्त्यांना आणि तुम्हा...आम्हा सर्वांना, 'घुसमट' म्हणजे काय हो भाऊ?, असा प्रश्न पडला आहे.

### ... यांना 'घुसमट' शिवला नाही!

माजी महापौर महेश कोठे, ॲड. यु. एन. बेरिया, नलिनी चंदेले, सुधीर खरटमल, एमआयएमचे माजी नगरसेवक तौफिक शेख व त्यांचे समर्थक माजी नगरसेवक यांची कुठलीही घुसमट न होता शिवाय ते ज्या पक्षात होते, त्या पक्षावर वा नेत्यांवर खापर न फोडता त्यांनी आपला वेगळ्या पक्षाचा मार्ग पत्करला. बसपाचे तत्कालिन माजी नगरसेवक आनंद चंदनशिवे आणि गणेश पुजारी नंतर वंचित बहुजन आघाडीत गेले. आता ते राष्ट्रवादी काँग्रेसच्या वाटेवर आहेत. त्यांनी 'घुसमट' हा शब्दप्रयोग वापरला नाही.

## संजय कोकाटे यांनी वाचला अन्यायाचा पाढा

### शिंदे गट : भाजपा मतभेद चव्हाट्यावर

उल्हास पाटील



मुंबई -कल्याण येथे भारतीय जनता पार्टीने मुख्यमंत्री शिंदे यांना सहकार्य करणार नसल्याचा ठराव केला. याचे पडसाद माढा तालुक्यात उमटले असून माढा शिवसेना लोकसभा संपर्कप्रमुख संजय कोकाटे यांनी भारतीय जनता पार्टीचा निषेध करत माढा तालुक्यातील भारतीय जनता पार्टी अन्याय करत असल्याचा वाचला पाढा. सोशल मीडियावर त्यांचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे. शिंदे गट व भारतीय जनता पार्टी यांच्यातील मतभेद चव्हाट्यावर आल्याने कार्यकर्ते संभ्रमावस्थेत आहेत.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यामुळे भारतीय जनता पार्टी सत्तेत आहे. हे लक्षात ठेवले पाहिजे. सोलापूर जिल्ह्यात भारतीय जनता पार्टीचा शिवसेना खूप अन्याय सहन करीत आहे. सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील वेळ देत नाहीत. माढा तालुक्यातील संजय गांधी निराधार योजनेच्या कमिट्या अद्याप झालेल्या जाहीर केल्या नाहीत. शिवसेनेची कोणतीही कामे होत नाहीत तर भारतीय जनता पार्टीचे कामे करा असा प्रशासनाला अलिखित आदेश असल्याचेही त्यांनी सांगितले. हे आम्ही सहन करणार नाही. माढा तालुक्यात जीवाचे रान करून व आमच्यावर २५ ते ३० वर्ष अन्याय झाला तरीही भारतीय जनता पार्टीचा लोकसभेचा खासदार निवडून देण्यासाठी प्रयत्न केला व निवडून दिला.

परंतु भारतीय जनता पार्टीतील अंतर्गत गटबाजीमुळे ज्याचा विरोध पत्करून काम केले, त्याच मंडळींना बरोबर घेतले जात आहे व ताकद दिली जात आहे. भारतीय जनता पार्टीचे अंतर्गत मतभेद मिटतील परंतु शिवसेना व मित्र पक्ष आगामी लोकसभा निवडणुकीमध्ये भाजपाच्या प्रचार करतील, असे मला वाटत नाही. माढा तालुका शिवसेनेच्या काही अपेक्षा नाहीत मात्र शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांची कामे होत नाहीत. दिलेल्या पत्रांना दहा दहा वेळा फोन करावा लागतो आहे. याबाबत आमची काही तक्रार नाही. ज्यासाठी रक्ताचे पाणी केले तेच मंडळी आज त्याच विरोधकांना घेऊन फिरत असतील तर भाजपाने भविष्यामध्ये शिवसेनेकडून मदतीची अपेक्षा करू नये असेही त्यांनी ठणकावून सांगितले.

भारतीय जनता पार्टीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी तालुक्यातील सर्वे पाहिला आहे. जर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तुमच्या बरोबर नसतील तर काय होईल याचा विचार करा व आपल्या वर्तनामध्ये बदल करावा आम्ही तुमच्या सोबत आहे. आम्हाला गोडीत समजून घ्यावे आमची चार कामे करावी व आपल्यामध्ये बदल होतील. भारतीय जनता पार्टीने हवेत उडणे बंद करावे व एकटे सत्तेत असल्याचा आविर्भाव सोडावा. विसरून जावून सर्व मित्र पक्षांना एकत्र घेऊन काम करावे अशी त्यांनी या व्हिडिओच्या माध्यमातून विनंती केली.

## विधानसभा निवडणूक प्रमुख पदामुळे रणवीर राऊत यांच्यावरील जवाबदारी वाढली!

सचिन अपसिंगकर



**भारतीय जनता पार्टीने आगामी लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुकांच्या दृष्टीने जोरदार मोर्चेबांधणी सुरू केली असून नुकतेच प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी ४८ लोकसभा व २४८ विधानसभा मतदार संघांमधील विधानसभा निवडणूक प्रमुखपदांच्या जवाबदर्या८ निश्चित केल्या आहेत. बार्शी विधानसभा मतदार संघाची जवाबदारी बावनकुळे यांनी आमदार राऊत यांचे पुत्र व बाजार समितीचे सभापति रणविर राऊत यांचेकडे दिली आहे. रणविर राऊत यांनी बाजार समितीच्या सभापति पदाची सूत्रे वर्षांपूर्वी स्वीकारली असून ते महाविद्यालयीन जीवनापासून सामाजिक व राजकीय कार्यात सक्रिय आहेत.**

आमदार राऊत यांच्या प्रमाणेच रणविर राऊत हे बार्शी तालुक्याच्या संघर्षमय राजकारणात अगदी विद्यार्थी दशेपासून सहभागी झाल्यामुळे त्यांनाही राजकीय खचखळग्यांची माहिती आहे. आमदार राऊत हे सन २०१७ सालापासून भारतीय जनता पक्षाशी जोडले गेले आहेत. २०१९ ची विधानसभा निवडणूक त्यांनी अपक्ष म्हणून लढविली असली तरी निवडून आल्यानंतर त्यांनी भाजपा समर्थक आमदार अशीच भूमिका विधिमंडळात घेतली. आमदार राऊत हे महाविकास आघाडी सरकारमध्ये सत्तेमध्ये वाटा मिळावा म्हणून सहभागी झाले नाहीत. त्यांनी भाजपाचीच पाठराखण करणे पसंत केले. दरम्यान भाजपचे ऑपरेशन लोटस सुरू असल्याची जोरदार चर्चा होती. या काळात आमदार राऊत यांनी शांतपणे वेट अँड वॉचचे धोरण पत्करले. अडीच वर्षानंतर राज्यात महाविकास आघाडी सरकार पायउतार झाले. शिंदे-फडणवीस यांचे सरकार अवतरले, आमदार राऊत यांनी भाजपावर दाखविलेल्या निष्ठेचे फळ त्यांना मिळाले. शिंदे-फडणवीस सरकार सत्तेवर आल्यानंतर आमदार राऊत यांची विकासकामांची घोडदौड सुरू झाली. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही आमदार राऊत यांना बार्शीच्या विकासकामांसाठी भरघोस पाठबळ दिले. आमदार राऊत यांनी फडणवीस यांच्या जंगीसभेचे बार्शीत आयोजन केले. यासभेत फडणवीस यांनी बार्शी तालुक्याच्या प्रलंबित विकास निधीच्या मागण्यांचा परामर्श घेतला. आमदार राऊत यांनी केलेल्या विविध विकास निधिच्या मागण्या त्यांनी उचलून धरल्या. बार्शी तालुक्यावर फडणवीस यांनी कोट्यवधी रुपयांच्या विकास निधीची अक्षरश: खैरात केली. यानिमित्ताने आमदार राऊत यांनी सध्या सत्तारूढ असलेल्या सरकारमध्ये आपले वजन किती आहे, हे दाखवून दिले. आता बार्शी तालुक्यातील नगरपालिका, पंचायत समिति, बाजार समितिच्या निवडणुका अगदी जवळ येऊन ठेपल्या आहेत, कोणत्याही क्षणी या निवडणुका जाहीर होऊ शकतात. सध्या शासकीय कार्यकाल असला तरी तालुक्यातील या सर्व महत्वाच्या सत्ताकेंद्रांवर आमदार राऊत यांचेच वर्चस्व होते. यासर्व मिनी विधानसभा निवडणुका तालुक्याच्या राजकारणासाठी अत्यंत महत्वाच्या आहेत. बार्शीमध्ये माजीमंत्री सोपल सध्या तरी ठाकरे गटात आहेत, राष्ट्रवादीमध्ये माजी नगराध्यक्ष विश्वास बारबोले यांनी प्रवेश केला आहे. काँग्रेसमध्ये शहराध्यक्ष विजय साळुंखे व माजी शहराध्यक्ष ॲड. जीवनदत्त अरगडे यांचेकडे पक्षाची सूत्रे आहेत. बार्शीमध्ये आगामी निवडणुकांमध्ये भारतीय जनता पार्टी विरूद्ध महाविकास आघाडी असाच पक्षीय सामना होण्याची दाट शक्यता आहे. अशा परिस्थितिमध्ये रणविर राऊत यांच्याकडे आलेले हे पद संघटनात्मक जबाबदारी यादृष्टीने व त्यांचे राजकीय अनुभव क्षेत्र वाढण्याच्या दृष्टीने महत्वाचे आहे. रणविर राऊत यांनी तालुक्यात युवक कार्यकर्त्यांची चांगली फळी निर्माण केली आहे. बाजार समिती सारख्या जिल्ह्यातील मोठी उलाढाल असलेल्या सहकारी संस्थेचे सभापतीपद भूषविताना त्यांचा विविध समाज घटकांबरोबर संपर्क आला आहे. त्यांच्या आगामी राजकीय वाटचालीसाठी सुद्धा हे पद महत्वाचे आहे. राजकारण हे प्रवाही असते, परिवर्तनशील असते, राजकारणात मिळालेल्या संधीचे सुवर्णसंधीमध्ये रूपांतर करून नेतृत्वगुण सिद्ध करावे लागतात. यादृष्टीने पक्षाने सोपविलेल्या जवाबदारीचा रणविर राऊत कसा उपयोग करून घेतात, यानिमित्ताने बार्शीकरांना कळणार आहे.

## फिलगुड

### राजकीय सूत्र

**चूल पेटवून काय मिळणार?,**
**घर पेटवू चला ।**
**आपल्या भवितव्यासाठी,**
**त्यांना आयुष्यातून उठवू चला।।**

**जात - धर्माच्या नावाने,**
**माणसे जळाली पाहिजे ।**
**सत्तेची खुर्ची कशी पण,**
**आपणाला मिळाली पाहिजे ।।**

**इतिहास उकरून काढा,**
**किंवा मढे उकरून काढा ।**
**रोज काहीपण करून,**
**दिसला पाहिजे राडा ।।**

**-विजय गायकवाड**

## सिंचन बैठकी मागील सत्य... खासदारांच्या कुरघोड्या झाल्या नित्य...

डी.एस.गायकवाड

**नुकत्याच पुणे येथे दोन सिंचन बैठका पार पडल्या यावरून भाजपा अंतर्गत राजकारण तापले असले तरी यामागील सत्य काय हे जाणून घेण्याचा प्रयत्न केला असता यातून खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांचा केविलवाना प्रयत्न उजेडात येतो.**

आमदार रणजितसिंह मोहिते पाटील यांनी सिंचन संदर्भात अगोदर बैठकीची मागणी केली असताना त्याचीच कॉपी करीत खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांनी सिंचन बैठकीच्या माध्यमातून आपले राजकीय पाणी मूरवण्याचा प्रयत्न केला असून त्यांचे हे भांडे उघडे पडले आहे त्यामुळे स्वकर्तुत्वाने काहीतरी करा स्वत:च्या डोक्याने नवीन काहीतरी विकास कामांचा अजेंडा राबवा अशा सूचना जनतेमधून खासदार साहेबांना दिल्या जात आहेत.

त्याचे असे झाले की, आमदार रणजितसिंह मोहिते पाटील हे नेहमीच पाणी प्रश्नावर अग्रेसिव्ह दिसतात. माढा करमाळा माळशिरस येथील पाणी प्रश्न निकाली निघावेत या संदर्भात त्यांनी दिनांक २४ मे रोजी वरिष्ठ पातळीवर पत्र व्यवहार केला आणि सिंचन संदर्भात बैठक घेण्याची विनंती केली आता इथपर्यंत खासदार साहेबांना ही बुद्धी सुचली नाही आणि वरिष्ठ पातळीवरून अजेंडा राबवण्यासाठी ज्यावेळेस ते पत्र खालच्या कार्यालयांना गेले त्यावेळेस ते पत्र लिकेज झाले आणि त्यानंतर तब्बल सहा दिवसांनी खासदार रणजीतसिंह नाईक निंबाळकर यांनी त्याचीच कॉपी मारत दिनांक ३१ मे रोजी सिंचन संदर्भात बैठक घेण्याची मागणी केली यावरच ते थांबले नाहीत तर लगेचच तारीख देण्याची त्यांनी अधिकारी वर्गाकडे आग्रही मागणी केली आणि पहिले पत्र वरिष्ठ अधिकाऱ्यांना मिळाले असताना सुद्धा त्यांनी खासदार साहेबांना दोन जून ही तारीख देऊन टाकली आणि याच दिवशी पाणीदार खासदार असल्याचा आव आणत सिंचन भवनला तेथील केबिनमध्ये ही बैठक पार पडली. आणि त्यानुसार गाजावाजा करण्यात आला. आमदार रणजीतसिंह मोहिते पाटील यांनी जे २४ मे रोजी पत्र दिले होते त्यांना पाच जून ही सिंचन बैठकीची तारीख अगोदरच देण्यात आली होती आणि त्यानुसार आमदार रणजीतदादांनी जनतेला सोबत घेऊन थेट अधिकाऱ्यासमोर अनेक प्रश्नांचा निपटारा केला.

मोहिते पाटील यांच्या विरोधक मंडळींच्या संपर्कात राहून त्यांच्याबरोबर कार्यक्रम घेवून ते सातत्याने खुन्नस देताना दिसत आहेत त्यामुळे भाजपा मध्ये असणारे चांगले वातावरण बिघडताना दिसत आहे.त्यामुळे प्रभारी असणारे राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यात लक्ष घालून खासदार यांना समज द्यावी अशी ही मागणी सध्या भाजपा मधील पदाधिकारी करताना दिसत आहेत.



### खासदार राष्ट्रवादीचे की भाजपाचे?

अलीकडील काळात राष्ट्रवादीचे उत्तम जानकर, आ.संजय शिंदे यांच्याच संपर्कात भाजपाचे खा.रणजितसिंह नाईक निंबाळकर दिसत आहेत. ज्या माळशिरस तालुक्याने त्यांना एक लाखाचे लीड दिले आणि ज्यांनी द्यायला लावले त्यांना विकास निधी देताना देखील ते दूजाभाव करताना दिसत आहेत अशीही यानिमित्ताने चर्चा रंगताना दिसत आहे.



### आ.राम सातपुते टेंशन मध्ये...

- खासदार नाईक निंबाळकर यांनी पालकमंत्री विखे पाटील यांना जानकारांच्या घरी नेल्याने आमदार सातपुते टेन्शनमध्ये आलेले दिसत आहेत.जानकर भाजपमध्ये येण्याच्या चर्चाला उधान आले आहे. आणि विधानसभेची उमेदवारी देखील त्यांना द्यायची तयारी सुरू असल्याची चर्चा आहे. त्यामुळे खासदार साहेबांच्या या डावामुळेआमदार सातपुते घायाळ झालेले दिसत आहेत.



त्यामुळे खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांचे भांडे उघडे पडले असून यावर व्यथीत होत ते आव्हान देण्याच्या राजकीय खेळ्या करू लागले आहेत आणि यातूनच पालकमंत्र्यांना राष्ट्रवादी नेत्याच्या घरी घेऊन जाणे अशा राजकीय खेळ्या सध्या होताना दिसताहेत.

CMYK